वर्ष-०९ | अंक-३० | मुंबई, मंगळवार १३ ते १९ जून - २०२३ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

पोलीस बातमी पत्र

•संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 बांबू शेती ठरतेय फायदेशीर...

3 → महारेराविरोधात प्रक्षोभ का?

कोल्हापुरात चोरी, घरफोड्यांचे सत्र सुरुच; टिकावने दरवाजा तोडून साडे सात लाखांचे दागिने लंपास ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

## ठाण्यात एका गुंडाने दुस-या गुंडाला चाकूने भोसकले; भर रस्त्यात खून झाल्याने दहशत




ठाणे : मुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्यात गुन्हेगारांचा वर्चस्ववाद उफाळून आला आहे. या वर्चस्ववादातून दोन कुख्यात गुन्हेगारांमध्ये वाद होऊन एकाने दुसऱ्याचा चाकूने वार करुन खून केला आहे. अमोल लोखंडे (वय ३९) असे हत्या झालेल्या गुडांचे नाव आहे. तर टक्या उर्फ जयेश डोईफोडे ( वय ३२) असे खून केलेल्या आरोपीचे नाव आहे. टक्याला पोलिसांनी अटक केली आहे. ही घटना ही घटना कल्याण पूर्वेतील समता नगर भागात असलेल्या नवीन दुर्गा माता मंदिर रोडवर घडली आहे.भर रस्त्यात चाकूने केले सपासप वार : अमोल लोखंडे ...पान २ वर...

# मीरा रोडच्या सरस्वती वैद्य हत्याकांडात रोज नवनवीन खुलासे

## पोलीस तपासात कोणती माहिती समोर?

मीरा रोडच्या सरस्वती वैद्य हत्याकांडात आता नवनवीन खुलासे समोर येत आहेत. आरोपी मनोज साने यानं मयत सरस्वती वैद्य हिची हत्या करुन तिचे तुकडे जवळच्या नाल्यात फेकल्याची माहिती आता समोर येत आहे. साने हा सरस्वतीच्या शरीराचे तुकडे करुन ते कुकरमध्ये उकडवत होता. त्यानंतर त्याची विल्हेवाट लावण्यासाठी त्याने काही तुकडे जवळच्या नया नगरच्या



बॅकरोड येथील रेल्वेच्या समांतर नाल्यात फेकल्याचं समोर आलं आहे. रविवारी सायंकाळच्या सुमारास नया नगर पोलीस आरोपीला घेऊन घटनास्थळी दाखल झाले होते आणि आरोपीला विचारुन तुकडे कुठे टाकले त्याची जागा निश्चित करत होते.

सीसीटीव्ही कॅमेऱ्यात प्रकार कैद

आरोपी मनोज साने राहत असलेल्या इमारतीच्या ...पान २ वर...

## लग्नाचे आमिष दाखवून मुलीवर अत्याचार, नांदेडमध्ये गुन्हा दाखल



नांदेड: २२ वर्षीय पीडित तरुणी ही मूळ अमरावती येथील रहिवासी आहे. मागील काही वर्षांपासून ती छत्रपती संभाजीनगर येथे वास्तव्यास होती. या दरम्यान ती एका कंपनीमध्ये कम्प्युटर ऑपरेटर म्हणून काम देखील करत होती. याच कंपनीमध्ये नांदेड शहरातील सराफा भागात राहणाऱ्या अब्दुल्ला सईद हा देखील काम करायचा. यामुळे त्या दोघात मैत्री झाली आणि मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले. त्यानंतर आरोपी हा लग्नाचे आमिष दाखवून त्या तरुणीवर अत्याचार करू लागला. सलग तीन वर्षे आरोपीने पीडित तरुणीवर अत्याचार केला. एवढेच नाही तर आरोपीने पीडित तरुणीला हैदराबादला नेले होते.अखेर तरुणीची तक्रार: या काळात पीडितेने अनेकवेळा तरुणाकडे लग्नाची मागणी केली. मात्र, तो नेहमीच तिला टाळायचा. परीक्षा देण्यासाठी नांदेडला ...पान २ वर...

## ५०३ ग्रम वजनाचा ०१,००,६०,०००/ रु. किंमतीचा मफेड्रान (एम.डी.) हा अंमली पदार्थ विक्री करीता बाळगणा-या परकीय नायजेरीयन इसमावर अंमली पदार्थ विरोधी पथकाची कारवाई.

मिरा भाईदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयांतर्गत मिरारोड, काशिमिरा, भाईंदर परिसरात अंमली पदार्था ची खरेदी विक्री करणारे ईसमांचा शोध घेवुन त्यांचेकडे काही आक्षेपार्ह चिजवस्तु मिळुन आल्यास कायदेशीर कारवाई करणेबाबत वरिष्ठांनी सुचना व मार्गदर्शन केले होते.

वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे अंमली पदार्थ विरोधी पथकाचे प्रभारी पो.नि. श्री. अमर मराठे व पोलीस स्टाफ हे दिनांक ०७.०६.२०२३ रोजी जी.सी.सी.क्बल हाटकेश ते बाबा टायर ...पान २ वर..



## पनवेल: वाहनचोरीची डोकेदुखी कायम; चार दिवसांत आठ वाहनांच्या चोरीची नोंद

वाहनचोरी रोखण्यासाठी पोलीस आयुक्त काय उपाययोजना करतात याकडे नवी मुंबईकरांचे लक्ष लागून राहिले आहे.

वाहनचोरीच्या आठ घटना खांदेश्वर, खारघर, कामोठे व तळोजा या परिसरात घडल्याची नोंद विविध पोलीस



ठाण्यात झाली आहे. यामुळे वाहनचोरी रोखण्यासाठी पोलीस आयुक्त काय उपाययोजना करतात याकडे नवी मुंबईकरांचे लक्ष लागून राहिले आहे. नवी मुंबई हे सुनियोजित शहर असले तरी वाहनतळाचे पुरेसे नियोजन नसल्याने वाहनमालकांना रस्त्यावरच वाहने उभी करावी लागतात. मागील दोन वर्षांत (२०२१, २०२२) ...पान २ वर...

## कल्याण पूर्वेत पूर्ववैमनस्यातून तरुणाची हत्या




कल्याण: येथील पूर्व भागातील काटेमानिवली मध्ये एका तरुणाची याच भागातील एका युवकाने पूर्व वैमनस्यातून धारधार चाकुचे वार करुन निर्घृ ण हत्या केली. रविवारी रात्री हा प्रकार घडला. याप्रकरणी कोळसेवाडी पोलिसांनी तत्पर हालचाली करुन मारेकरी तरुणाला अटक केली.

अमोल लोखंडे (३९, रा. कांचन कॉलनी, समतानगर, काटेमानिवली, कल्याण) असे मयत तरुणाचे नाव आहे. जयेश उर्फ टाक्या डोईफोडे असे मारेकरी तरुणाचे नाव आहे. अमोल आणि जयेश यांच्यात यापूर्वी काही कारणावरुन वाद झाला होता. दरम्यानच्या काळात या विषयावर पडदा पडला होता. परंतु, जयेशच्या मनात अमोल विषयी राग होता. लाखांचा गंडा, दोघांविरुद्ध ...पान २ वर...

## पालघर पोलिसांकडून अंमली पदाथार्ची वाहतुक करर्णाया दोन आरोपींवर कारवाई



११/०६/२०२३ रोजी श्री. बाळासाहेख पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांना गोपनीय यातमीदाराकडुन माहिती प्राप्त झाली की, उमरगाव बाजुकडून तलासरीकडे अंमली पदार्था ची विक्री करण्याकरीता बेकायदेशिररीत्या वाहतुक करून घेऊन जाणार असल्याबाबत माहिती प्राप्त झाली. सदरची माहिती प्राप्त होताच श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांनी श्री. पंकज शिरसाट, अपर पोलीस अधीक्षक, पालघर यांचे मार्गदर्शनाखाली श्री. अजय वसावे, पोलीस निरीक्षक, तलासरी पोलीस ठाणे व ...पान २ वर...

## लाखो रुपये किमतीचा गहाळ झालेला मुद्देमाल व रोख रक्कम अवघ्या 02 तासांत शोधुन देण्यास नायगाव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकास यश.

नायगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणारी माहिला नामे संगीता हैतुम सिंग रा. रुम नं १०५, ए विंग, महालक्ष्मी दर्शन, स्टारसिटी, नायगाव पुर्व हया दिनांक ०६/०६/२०२३ रोजी मरीन्स लाईन्स, मुंबई ते राहते घर असे टॅक्सीने प्रवास करीत असताना प्रवासादरम्यान खबर देणार यांची बग कोठेतरी पडुन त्यातील सोन्याचे ०८ तोळे दागिने व ५०,०००/ रुपये रोख रक्कम गहाळ झाल्याबाबत कळविल्याने नायगाव



पोलीस ठाणेत गहाळ मालमत्ता नोंद क्रमांक १५८/२०२३ अन्वये दाखल करण्यात आले. सदर गहाळ मालमत्तामध्ये सोन्याचे ०८ तोळे दागिने व ५० हजार रुपये रोख रक्कम किमंतीचा मुद्देमाल असल्याने सदर बाबीचे गांभीर्य लक्षात घेवुन नायगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रमेश भामे यांच्या आदेशाने नायगाव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण ...पान २ वर...

## ४ करोड रुपयांची खंडणी मागणा-या ३ सख्या भावांना १२ तासाचे आत अटक. पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी



पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०२/०६/२०२३ रोजी दुपारी ०२:०० वाजता फिर्या दीयांना आरोपीत विजय शंकर व डेव्हीड यांनी मिळुन पावर प्रेसचे मशिन दाखवण्याचे उद्देशाने तुंगारेश्वर येथुन फिर्या दीचे गाडीतुन कोपर, मांडवी येथे घेवुन जावुन त्यास सुमारे ७ तास बंधक बनवुन फिर्या दीचा गळा दाबुन चाकुचा धाक दाखवुन ४ करोड रुपयाची खंडणी मागुन तडजोडी अंती २५ लाख रुपयाची खंडणी देण्याचे ठरले नंतर आरोपीत यांनी फिर्या दी जवळ असलेले रोख १५,०००/ रुपये व ए.टी.एम. मशिन मधुन २५,०००/ रुपये अशी रोख रक्कम जबरदस्तीने घेवुन पोलीसांना कळविले अथवा ठरलेले पैसे दिले नाही तर फिर्या दीचे पत्नीस व मुलांना मारुन ...पान २ वर...

## ठाणे न्यायालयाकडून आरोपी शाहनवाझ खानला तीन दिवसाची ट्रान्झिट रिमांड

मुंबई : गेमिंग ॲपद्वारे धर्मांतर केल्याप्रकरणी महाराष्ट्र पोलिसांसोबत संयुक्त कारवाईक करत युपी पोलिसांनी बद्दो उर्फ शाहनवाजला रविवारी अटक केली. आरोपी बद्दोला गाझियाबादला येण्यात येणार आहे, ठाणे न्यायालयाने युपी पोलिसांची ट्रान्झिट रिमांड विनंती मान्य केली आहे. न्यायालायाने तीन दिवसांची म्हणजेच 15 जूनपर्यंत ट्रान्झिट रिमांड दिला आहे. धर्मांतर प्रकरणात आरोपींची सखोल चौकशी करुन




आणखी नवीन खुलासे काढून घेण्यासाठी युपी पोलिसांनी बद्दोची ट्रान्झिट रिमांड मागितली होती.ट्रान्झिट रिमांड का : गाझियाबाद पोलीस महाराष्ट्रातील बद्दोच्या ट्रान्झिट ...पान २ वर...

## चोरीच्या टेम्पोचा वापर करुन वेगवेगळया ठिकाणावरुन बकरे चोरी करुन विक्री करणा-या टोळीस पकडण्यात गुन्हे शाखा, कक्ष २ वसई यांना यश

आचोळा पोलीस ठाणे हददीत दिनांक ०६/०६/२०२३ रोजी रात्री ०२.०० ते ०४.०० वा दरम्यान फिर्या दी अकील खादीम कुरेशी, वय ३४ वर्षे, रा. रायल अपार्टमेन्ट, अलकापुरी, नालासोपारा पुर्व यांनी त्यांचे अलीया चिकण व मटण शाप अलकपुरी, नालासोपारा पुर्व येथील दुकानात ठेवलेले ४५,०००/ रुपये किंमतीचे एकुण ४ बकरे हे अज्ञात आरोपीतांनी त्याचे दुकानाचे शटर तोडुन छोटा हाती टेम्पो मधुन चोरी करुन नेले बाबत गुन्हयातील फिर्या दी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन आचोळे पोलीस ठाणेत दिनांक ०९/०६/२०२३ रोजी १२.२८ वा. गु.रजि.नं. २९५/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३८०, ३४ प्रमाणे



गुन्हा दाखल करण्यात आला होता. वसई परीसरात वेगवेगळया ठिकाणी अशाच प्रकारचे गुन्हे घडल्याने सदर गुन्हे उघडकीस आणण्याकरीता वरिष्ठांनी दिलेल्या आदेशावरुन गुन्हे शाखा, कक्ष २, वसई युनिटचे अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचा समातंर तपास सुरु करुन मिळालेल्या तांत्रिक व गोपनीय माहितीच्या आधारे बकरे चोरी करण्यासाठी चोरीचा टेम्पो घेवुन जाणा या आरोपीत नामे १) मुस्तफा मोहम्मद आबीद हाशनी, वय २४ वर्षे, रा. सबिनाचाळ, धानीव, नालासोपारा पुर्व (वाहन चालक), २) मोहम्मद कलीम मोहम्मद कलाम कुरेशी, वय ३६ वर्षे, रा. चिंचोटी, पाटीलपाडा, वसई पुर्व, ३) ईबारतअली उर्फ सिध्दु गुलाम हुसेन खान, वय १९ वर्षे, रा. धानीवबाग तलावाचे जवळ, नालासोपारा पुर्व यांना फादरवाडीनाका, वसई पुर्व येथे सापळा रचुन चोरीच्या टेम्पोसह दिनांक ०९/०६/२०२३ रोजी ताब्यात घेतले व त्यांचेकडे अधिक विचारपुस करता त्यांनी टेम्पोचा वापर करुन वसई परीसरातुन तसेच दिवा (मुंब्रा) येथुन बकरे चोरी करुन ते मुंबई येथे विक्री केल्याचे निष्पन्न झाले आहे. नमूद आरोपीतांकडून २,५०,०००/ रुपये किंमतीचा छोटा हात्ती टाटा टेम्पो क्रमांक एम.एच.०५ बी.एच ५४९३ हा जप्त करण्यात ..पान २ वर...

## बाप रे! आता या पोलिसांनी करायचे काय?

# मुंबई पोलिसांच्या ११६ कुटुंबीयांना तातडीने घरे खाली करण्याची नोटीस

मुंबई : ऐन पावसाळ्याच्या तोंडावर मुंबईकरांच्या सुरक्षेची जबाबदारी वाहणा-या मुंबई पोलिसांच्या डी बी मार्ग पोलीस वसाहतीत राहणाऱ्या तब्बल ११६ पोलीस कुटुंबीयांना तातडीने घरे खाली करण्याची नोटीस बजावण्यात आली आहे. या पोलिसांना डी बी मार्गऐवजी माहीम, नायगाव, वरळी येथील पर्या यीघरं दिली आहेत. त्यामुळे मुलांच्या शाळांचे कसे करायचे, हे दुसरे संकटही या



पोलिसांसमोर उभे राहिले आहे.स्ट्रक्चरल ऑडिटमध्ये या इमारती धोकादायक असल्याने पोलीस कुटुंबीयांना नोटिसा पाठवण्यात आल्या आहेत. त्यातच डी बी मार्गऐवजी इतर ठिकाणी दिलेली घरे सुध्दा अतिशय निकृष्ट दर्जा ची असल्याचा पोलीस कुटुंबियांचा दावा आहे.डी बी मार्ग ऐवजी माहिम, नायगाव, वरळी आदी ठिकाणी पर्या यी घरं दिली. गेल्या ..पान २ वर...

# बियाणे खरेदी करताना...

**आपल्या भागातील वातावरण व जमिनीचा विचार करून योग्य त्या पिकाची निवड करावी. आपल्या भागासाठी शिफारशीत वाणाच्या निवडीला प्राधान्य द्यावे. गेल्या दोन, तीन वर्षांमध्ये आलेल्या रोग आणि किडींचा अंदाज घेऊन, त्यासाठी प्रतिकारक्षम किंवा सहनशील वाण असल्यास त्याची निवड करावी.**



सिंचनाच्या व्यवस्थेनुसार योग्य त्या वाणाची निवड करावी. कोरडवाहू जमिनीसाठी शिफारस केलेले वाण हे कमी पावसाच्या स्थितीतही चांगल्या प्रकारे वाढू शकतात. आपल्या परिसरातील कृषी विभागातील कृषी अधिकारी, शास्त्रज्ञ यांच्यासोबत चर्चा करून नवीन, सुधारित, संकरित वाणाची माहिती घ्यावी.

उत्तम प्रतीचे खात्रीशीर व नोंदणीकृत बियाणे विक्रेत्याच्या दुकानातूनच खरेदी करावे. शक्यतो कृषी विद्यापीठे किंवा विद्यापीठाचे संशोधन केंद्राकडे बियाण्यांच्या उपलब्धतेसाठी हंगामपूर्व नोंदणी करावी. त्यामुळे सुधारित बियाण्यांचे पेरणीपूर्वी निश्चित उपलब्धता होऊ शकते. बियाण्याची खरेदी करताना कंपनीचे प्रतिनिधी, विक्रेते किंवा जाहिराती यावर अवलंबून बियाणे खरेदी टाळावी.

बियाण्याचे प्रामुख्याने मूलभूत/पैदासकार बियाणे, पायाभूत बियाणे, प्रमाणित बियाणे व सत्यप्रत बियाणे असे चार प्रकार पडतात.

१) मूलभूत/पैदासकार बियाण्यांची आनुवंशिक शुद्धता १०० टक्के असते. हे बियाणे त्या पीक पैदासकाराच्या देखरेखीखाली तयार केले जाते. हे बियाणे सामान्य शेतकऱ्यांच्या शेतात लागवडीसाठी उपलब्ध नसते. मूलभूत/पैदासकार बियाण्यासाठी पिवळ्या रंगाची (खूण चिठ्ठी) लावलेली असते.


२) पायाभूत प्रकारचे बियाणे तयार करण्यासाठी मूलभूत बियाणे वापरले जाते. पायाभूत बियाण्यांच्या पिशवीवर पांढऱ्या रंगाचा टॅग (खूण चिठ्ठी) लावलेला असतो.

३) प्रमाणित बियाणे हे पायाभूत बियाण्यांपासून तयार केले जाते. प्रमाणित बियाणे हे नोंदणीकृत शेतकऱ्यांच्या शेतावर तयार केले जाते. याचे उत्पादन प्रमाणीकरण एजन्सीच्या देखरेखीखाली होते आणि प्रमाणीकरण एजन्सीद्वारे मंजूर केले जाते. या बियाण्यास निळ्या रंगाचा टॅग असतो.

४) सत्यप्रत बीजोत्पादनासाठी प्रमाणित बियाण्यांचा वापर करतात. हे बियाणे शेतकरी शेतावर तयार करू शकतात. मात्र या बियाण्यांची आनुवंशिक शुद्धता चांगली असणे गरजेचे आहे. सत्यप्रत बियाण्यासाठी हिरव्या रंगाचा टॅग असतो. बियाण्याची वैधता तपासणी दिनांकापासून ९ महिने असते, तर नूतनीकरण केलेल्या बियाण्याची वैधता ६ महिन्यांपर्यंत असते. या बाबी पाहूनच बियाणे खरेदी करावे.

# बांबू शेती ठरतेय फायदेशीर...

**कमी पैशात जास्त नफा देणारे पीक घेऊन झटपट श्रीमंत व्हायचे असेल तर बांबू शेती हा उत्तम पर्याय ठरू शकतो. यामुळे अनेक शेतकरी याकडे वळले आहेत. बांबूचे झाड किमान ४० वर्षं जगू शकते. त्यामुळे एकदा लावलेल्या बांबूपासून चाळीस वर्षे उत्पन्न घेता येऊ शकते. यामुळे हे फायदेशीर आहे.**



सध्या बाजारात बांबू हा असा घटक आहे की त्याचा वापर अनेक उद्योगधंद्यात केला जातो. तसेच याचे उत्पन्न कमी आणि मागणी वाढली आहे. यामुळे यासाठी सरकारदेखील प्रयत्नशील आहे. फर्निचर निर्मितीपासून ते अनेक कामांसाठी बांबू वापरला जातो.

भारत दर वर्षी ६० दशलक्ष कोटी रुपये किमतीच्या बांबूची आयात करतो. बांबू व्यवसायासाठी जास्त पैसे खर्च करण्याची गरज नाही. सुरुवातीला त्याची किंमत फक्त २ लाख रुपये आहे. शेतीबरोबर जोडव्यवसायही करून आपण चांगले पैसे कमवू शकतो.

मानवी जीवनात खाद्यान्न म्हणून ज्याचा उपयोग प्रामुख्याने केला जातो ती सर्व पिके तृणवर्गीय आहेत. ज्वारी, मका, बाजरी, गहू ही मुख्य पिके एक प्रकारे गवताचाच प्रकार आहे. याचबरोबर ऊसही गवतच म्हणून ओळखले जाते. याच पद्धतीने बांबूसुद्धा एक गवताचाच प्रकार आहे.

पूर्वी या बांबूचा वापर प्रामुख्याने घरासाठी केला जात आहे. झोपडी बांधण्यापासून ते आधुनिक काळातील बांबू हाऊसपर्यंत याचा वापर केला जात आहे. याशिवाय घरामध्ये वापरण्यात येत असलेल्या बैठक व्यवस्थेसाठीही बांबूचा वापर केला जात आहे. तसेच बांबूच्या कोवळ्या कोंबाचा वापर भाजीसाठी आणि लोणच्यासाठीही करण्यात येतो.

बांधकाम क्षेत्रात बांबूचा वापर अमर्याद पद्धतीने केला जातो. तसेच इंधन निर्मितीबरोबरच कागद उद्योगामध्येही बांबूचा वापर होत असल्याने बाजारातील बांबूची मागणी वाढतच आहे. आजच्या घडीला बांबू उद्योगातील देशांतर्गत उलाढाल २५ हजार कोटींची आहे. तसेच यासाठी ज्या शेतकऱ्यांना बांबूची शेती करायची आहे त्यांना प्रोत्साहनपर अनुदान देण्यासाठी केंद्र सरकारने बांबू मिशन सुरू केले आहे. या अंतर्गत शेतकऱ्यांना बांबू शेती करण्यासाठी प्रतिझाड १२० रुपये शासकीय अनुदान दिले जाते. देशात सातत्याने बांबूला मागणी वाढत आहे. या पार्श्वभूमीवर तुम्ही बांबू शेती सुरू केली तर मोठा आर्थिक फायदा मिळू शकतो. दर वर्षी पुनर्लागवड करण्याची गरज नसते. कारण बांबूचे झाड किमान ४० वर्षं जगू शकते. त्यामुळे एकदा लावलेल्या बांबूपासून चाळीस वर्षे उत्पन्न घेता येऊ शकते.

# बीबीएफ लागवड तंत्रज्ञान

**देशाला कृषिप्रधान करणाऱ्या शेतीव्यवस्थेला प्रगतशील करण्यासाठी बी.बी.एफ पेरणी पद्धत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे कधी अतिवृष्टी तर कधी कोरडा दुष्काळ याचा सामना शेतकरी करत असतात आणि याचाच परिणाम पिकांवर होऊन उत्पादनात घट होते. अशावेळी पडणाऱ्या पावसाचे जास्तीत जास्त पाणी जमिनीत मुरविणे, तसेच अधिक पावसात अतिरिक्त पाणी शेताबाहेर सुरक्षितपणे निचरा करणे, उत्पादन वाढीसाठी रुंद वरंबा सरी लागवडपद्धत फायदेशीर ठरते.**



### बी.बी.एफ पेरणी पद्धत म्हणजे काय ?

हे ट्रॅक्टर चलित पेरणी यंत्र असून रुंद वरंबे व सऱ्या पाडणे, पेरणी आणि खते देणे अशी तिन्ही कामे एकाच वेळी केली जातात. यामध्ये दोन फाळ आणि पेरणीचे फण यातील अंतर गरजेनुसार कमी जास्त करता येते. तसेच सऱ्यांची रुंदीही कमी जास्त करता येते. उदा. वरंब्यावर सोयाबीन पिकाच्या ३ ते ४ ओळी ३० सें.मी. किंवा ४५ सें.मी. अंतरावर ३ ओळी घेता येतात. फाळामध्ये तयार होणाऱ्या सऱ्यांची रुंदी ३० ते ४५ सें.मी. गरजेनुसार ठेवता येते. कोरडवाहू शेतीमध्ये जलसंधारणाच्या दृष्टीने बीबीएफ पद्धत अतिशय उपयुक्त आहे. तसेच अधिक व सततच्या पावसामध्ये अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याच्या दृष्टीने बीबीएफ पद्धत उपयोगी आहे. या पद्धतीमुळे सर्वसाधारणपणे २० ते २७ टक्क्यांपर्यंत जलसंधारण तर २५ टक्के उत्पादनात वाढ दिसून आली आहे.

### बी.बी.एफ पेरणी यंत्र कशाप्रकारे फायदेशीर ठरते ?

बीबीएफ पेरणी यंत्राच्या साहाय्याने उतारास आडवी पेरणी केल्यास मूलस्थानी जलसंधारण होते. या पध्दतीत कोरडवाहू शेतीमध्ये जलसंधारणाच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त आहे. पावसाच्या दीर्घकालीन खंड काळात याचा लाभ होतो. आंतरपीक पध्दतीचा अवलंब करून अधिकचे उत्पन्न घेता येते. बीबीएफ पध्दतीने निविष्ठा खर्चात (बियाणे ,खते इ.) २० ते २५% बचत. खत व बियाणे एकाच वेळी पेरल्यामुळे खताचा कार्यक्षम वापर होतो. उत्पन्नामध्ये २५ ते ३०% वाढ होते. वरंब्यावर ओलावा टिकून ठेवला जात असल्याने पर्जन्यमान खंडाच्या कालावधीतसुध्दा पाण्याच्या ताणाची तीव्रता कमी होते. जास्त पर्जन्यमान झाल्यास या पद्धतीमधील सरीमधून अतिरिक्त पाणी वाहून जाण्यास मदत होते. पिकास मुबलक हवा, सूर्यप्रकाश मिळाल्याने पिकाची जोमदार वाढ होऊन पीक कीड रोगास बळी पडत नाही.

पिकामध्ये आंतरमशागत करणे उभ्या पिकांस सरीमधून ट्रॅक्टर/मनुष्य चलीत फवारणी यंत्राद्वारे कीटकनाशक फवारणे शक्य होते. या पध्दतीचा अवलंब केल्याने जमिनीची धूप कमी प्रमाणात होऊन सेंद्रिय कर्बाचा ऱ्हास थांबल्याने जमिनीची जलधारण क्षमता वाढते. या पध्दतीमुळे जमिनीची सच्छीद्रता वाढून जमीन भुसभुशीत होते. परिणामी पिकाची वाढ उत्तम होते. तण नियंत्रण व आंतरमशागतीच्या दृष्टीने ट्रॅक्टरचलित बीबीएफ यंत्राचा वापर करता येतो. यामध्ये पेरणीचे फण काढून तेथे आंतरमशागत आणि तण नियंत्रणासाठी व्ही, आकाराची फास बसविता येते तसेच सरीमध्ये रिजर ठेवून आंतरमशागत होते.



## ५०३ ग्रम वजनाचा ०१,००,६०,०००/ रु.

बाजुकडे मिरारोड (पुर्व) येथे गस्त करीत असताना एक परकीय नायजेरीन इसम हा त्याचे खांदयावर ब्राउन रंगाची हन्डबग अडकवलेल्या स्थितीत संशयास्पद आढळुन आल्याने वर नमुद स्टाफ यांनी कायदेशीर बार्बीची पुर्तता करुन त्यास ताब्यात घेत असताना तो पळुन जाण्याचा प्रयत्न करीत होता. पोलीस स्टाफने सदर इसमास शिताफीने ताब्यात घेवुन त्याची झडती घेतली असता त्याचे कब्ज्यात 403 TA वजनाचा ०१,००,६०,०००/ रु. किमतीचा मफेड्टान हा अंमली पदार्थ विक्री करीता बाळगला असल्याचे निदर्शनास आले. सदर नयजेरीयन इसमाविरुध्द काशिमीरा पोलीस ठाणेत गुन्हा रजि. क्र. गा 823/23 एन.डी.पी.एस कायदा १९८५ चे कलम ८ (क), २२ (क) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास अंमली पदार्थ विरोधी पथक करीत आहे. सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. विजयकुमार मराठे, सहायक पोलीस आयुक्त (मुख्यालय) तथा अति. कार्यभार सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथकाचे प्रभारी पो.नि. अमर मराठे, स.पो.नि.विलास कुटे, पो.हवा. इंगळे, टक्के, पाटील, आव्हाड, सपकाळ, म.पो.हवा. एक्कलदेवी, पो.अंम .यादव यांनी केली आहे.

## पनवेल: वाहनचोरीची डोकेदुखी

नवी मुंबईतून १९८९ वाहने चोरट्यांनी लंपास केली. त्यापैकी अवघ्या ६२५ वाहनांचा पोलिसांनी शोध लावला. हा काळ तत्कालीन आयुक्त बिपीनकुमार यांच्या नेतृत्वाचा होता. यामध्ये सर्वा त जास्त वाहनचोरीची संख्या नवी मुंबईतील रस्त्याकडेला आणि रेल्वेस्थानक परिसरात उभ्या केलेल्या वाहनांची आहे. वाहनचोरीचे सत्र विद्यमान पोलीस आयुक्तांच्या कारकिर्दीत कमी झालेले नाही. खांदेश्वर पोलीस ठाण्यात ८ जून रोजी यामध्ये सेक्टर-१० मधील तीर्थराज सोसायटीमधून दुपारी ६५ हजारांची दुचाकी चोरीस गेल्याची नोंद करण्यात आली तर ९ जूनला खांदेश्वर पोलीस ठाण्यात वाहनचोरीच्या दोन घटना नोंदविल्या गेल्या. यामध्ये कोप्रोली येथे राहणारे जयेश खोत यांची सकाळी साडेदहा वाजता आणि मयूर पटेल यांची सेक्टर-१७ येथे उभी केलेली २५ हजार रुपयांची दुचाकी चोरीस गेली. याच दिवशी अजहर पटेल यांची रात्री तळोजा गावातील मशिदीजवळ उभी केलेली ३० हजार रुपयांची मोटर चोरीस गेली. तसेच १० जूनला खांदेश्वर रेल्वे स्थानकाच्या पूर्व बाजूस उभी केलेली अजयकुमार पांडे यांची पंधरा हजार रुपयांची दुचाकी चोरीस गेली. त्याच दिवशी खारघर वसाहतीमध्ये दोन वाहनचोरीच्या घटनांची नोंद पोलीस ठाण्यात झाली. सेक्टर-२० येथील ही दोन्ही वाहने आहेत. सायंकाळी सहा वाजता बिटामॅक्स दुकानासमोरून ६० हजार रुपयांची दुचाकी चोरीस गेली. तसेच अडीच लाख रुपये किमतीची मोटारकार 'शुभ होम' या इमारतीमधून चोरीस गेली. तर ११ जूनला म्हणजे रविवारी खांदेश्वर पोलीस ठाण्यात पनवेल रेल्वे स्थानकाच्या पूर्व बाजूकडे उभी केलेली २५ हजार रुपयांची दुचाकी चोरीस गेल्याची नोंद करण्यात आली आहे.

## लग्नाचे आमिष दाखवून मुलीवर अत्याचार,

आलेल्या तरुणीला आपली फसवणूक झाल्याचे समजले आणि तिने थेट शिवाजीनगर पोलीस ठाणे गाठत तक्रार दाखल केली. पोलिसांनी पीडित तरुणीच्या फिर्या दीवरून अब्दुल्ला सईद विरुद्ध बलात्काराचा गुन्हा दाखल केला. पोलिसांनी आरोपीला ताब्यात देखील घेतले आहे. प्रेमापोटी नांदेडमध्ये अॅडमिशन: प्रेमापोटी कोण काय करेल याचा काही नेम नसतो. याचाच प्रत्यय पीडित तरुणी बाबत आला आहे. पीडित तरुणीने आपला प्रियकर नांदेड येथे राहत असल्याने तिने नांदेडमध्ये मुक्त विद्यापीठात एम. कॉम.साठी प्रवेश घेतला होता. ती मागील दोन वर्षांपासून नांदेडमध्ये शिक्षण घेत आहे. परीक्षेच्या वेळी ती नांदेडला राहत होती. सध्या ती एम. कॉम.च्या द्वितीय वर्षा ची परीक्षा देत आहे. परीक्षेच्या तयारी दरम्यान आरोपीने लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार केला, असे पीडित मुलीने आपल्या तक्रारीत म्हटले आहे.

## ठाण्यात एका गुंडाने दुस-या

आणि टक्या उर्फ जयेश यांच्यामध्ये वर्चस्ववादातून भांडण होते. त्यामुळे या दोघांमध्ये कायमच वितुष्ठ असायचे. त्यातच यातील टक्या उर्फ जयेश डोईफोडे याने अमोल लोखंडे याची कल्याण पूर्वेतील समता नगर भागात असलेल्या नवीन दुर्गा माता मंदिर रोडवर सपासप वार करुन हत्या केली. भरदिवसा घडलेल्या या घटनेने परिसरात मोठी दहशत निर्मा णझाली आहे. याप्रकरणी कोळसेवाडी पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करून हल्लेखोर टक्या उर्फ जयेश डोईफोडे ( वय ३२) या कुख्यात गुन्हेगाराला पोलिसांनी अटक केले आहे.खून करुन घटनास्थळावरून झाला फरार : कल्याण पूर्वेतील विवीध भागात स्थानिक गुंडांच्या टोळया आजही आपआपल्या भागात गुन्हेगारीचे वर्चस्व राहावे, यासाठी नेहमीच टोळी युद्ध पाहवयास मिळत आहे. त्यातच मृत अमोल व आरोपी जयेश यांच्यात पूर्वीपासूनच पूर्व वैमनस्य होते. परिसरात वर्चस्व राखण्यासाठी पुन्हा दोघांमध्ये रविवारी रात्रीच्या सुमारास कल्याण पूर्वेतील समता नगर भागातील नवीन दुर्गा मातामंदिर रोडवर वाद झाला. याच वादातून भररस्त्यात हल्लेखोर गुंड जयेशने अमोलची धारदार चाकूने सपासप वार करून निर्घृ ण हत्या करून घटनास्थळावरून फरार झाला होता.न्यायालयाने ठोठावली पोलीस कोठडी : दरम्यान घटनेची माहिती कोळसेवाडी पोलिसांना मिळताच एक पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर पंचनामा करत अमोलचा मृतदेह उत्तरणीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात रवाना केला. दुसरीकडे हल्लेखोर जयेशवर हत्येचा गुन्हा दाखल करून कोळसेवाडी पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला असता, काही तासातच त्याला ताब्यात घेऊन अटक केली. अटक आरोपीला आज (सोमवारी ) कल्याण जिल्हा सत्र न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने टक्या उर्फ जयेशला पोलीस कोठडी सुनावली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास कोळसेवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक महेंद्र देशमुख यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (गुन्हे) एस. जी. गवळी हे करीत आहेत.

## मीरा रोडच्या सरस्वती वैद्य

सीसीटीव्ही कॅमेऱ्यात तो सरस्वतीच्या शरीराचे अवयव एका पिशवीत घेऊन जाताना दिसत आहे. त्याचबरोबर आरोपी मनोज साने हा मृत सरस्वतीच्या मृतदेहाचे तुकडे टाकताना अत्यंत सावधगिरी बाळगत असल्याचंही सीसीटीव्हीतून समोर आलं आहे. इमारतीची लिफ्ट सातव्या मजल्यावर थांबल्यावरच तो मृतदेहाच्या तुकड्यांनी भरलेल्या प्लास्टिकच्या पिशव्या घेऊन घराबाहेर पडत असल्याचं दिसून येत आहे. रोपीच्या घरातून काही औषधं देखील मिळाली पोलिसांना आरोपीच्या घरातून काही औषधं देखील मिळाली आहेत, त्याचा तपास आता नया नगर पोलीस करणार आहेत. मयत सरस्वती वैद्य यांच्या तीन बहिणी काही नातेवाईकांसह सकाळी नया नगर पोलीस ठाण्यात आल्या होत्या. मृत सरस्वती वैद्यची बहीण आपल्या बहिणीचा मृतदेह घेण्यासाठी जे.जे. हॉस्पिटलला निघाली होती. सोमवारी (12 जून) नया नगर पोलीस बहिणी आणि मृत सरस्वती वैद्य यांची डीएनए चाचणी करणार होते. त्यानंतर, सरस्वती वैद्य यांचे पार्थिव डीएनए चाचणीनंतर बहिणींच्या ताब्यात दिले जाणार होते. दोघांचा विवाह झाल्याचं समोर आरोपी मनोज साने याने वसईतील तुंगारेश्वर मंदिरात मयत सरस्वती वैद्यशी विवाह केल्याची माहिती देखील आता समोर आली आहे. तर, मयत सरस्वतीच्या लहान बहिणीने 1998 मध्ये लग्नाच्या दोन वर्षांनंतर आत्महत्या केल्याचं समोर आलं आहे. पोलीस घेणार पत्रकार परिषद या सर्व घटनेबाबात नया नगर पोलीस कॅमेऱ्यासमोर बोलण्यास नकार देत आहेत. मात्र, मंगळवारी (13 जून) पोलीस पत्रकार परिषद घेऊन आतापर्यंतच्या हत्याकांडातील तपासाची माहिती देणार असल्याचं समजत आहे.

## चोरीच्या टेम्पोचा वापर करुन

आला असून एकूण ५ गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत. सदर गुन्ह्याचा पुढील तपास आचोळे पोलीस ठाणे करीत आहे. उघडकीस आलेले गुन्हे खालीलप्रमाणे : अं. नं. पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. व कलम 3 आचोळा पोलीस ठाणे गु.र.क्र २९५/२०२३, भा.दं.वि.सं. कलम ३८०, ३४ प्रमाणे २ माणिकपुर पोलीस ठाणे गु.र.क्र २१६/२०२३. भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे 2. पेल्हार पोलीस ठाणे TTR ५५१/२०२३. भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे 8 मुंब्रा पोलीस ठाणे गु.र.क्र ५८२/२०२३. भा.दं.वि.सं. कलम ४५७, ३८० प्रमाणे ५. महात्मा फुले चौक कल्याण गु.र.क्र २८६/२०२३. भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, कक्ष २ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक श्री. शाहुराज रणवरे, स.पो.निरी. सुहास कांबळे, सागर शिंदे, सहा.फौज. रमेश भोसले, संजय नवले, पो.हवा. चंदन मोरे, महेश पागधरे, सचिन पाटील, जगदीश गोवारी, रमेश आलदर, सुधीर नरळे, दादा आडके, पोना. प्रशांतकुमार ठाकुर, पो.अंम. अमोल कोरे यांनी केली आहे.

## ठाणे न्यायालयाकडून आरोपी शाहनवाझ

रिमांडसाठी प्रयत्न करणार असून त्याला लवकरात लवकर गाझियाबादला नेण्यात येणार आहे. दुपारी एक वाजात बद्दोला ठाणे येथील न्यायालयात हजर केले गेले. त्यानंतर न्यायालयाने युपी पोलिसांची रिमांडची विनंती मान्य केली. गाझियाबाद पोलिसांना पुढील चौकशीसाठी बद्दोला लवकरात लवकर गाझियाबादमध्ये घेऊन जायचे आहे. आरोपीला गाझियाबादला परत आणण्यासाठी सर्व औपचारिकता पोलिसांनी पूर्ण केल्या आहेत. ट्रान्झिट रिमांड मिळाल्यानंतर बद्दोला गाझियाबादला नेले जाईल, जेणेकरून चौकशीतून अजून त्याच्या कटकारस्थानाविषयीची नवीन माहिती समोर येईल. याप्रकरणातील आणखीन नवीन खुलासे समोर येतील. कोण-कोण आहे सहभागी : या प्रकरणाचे तार दुबईशीही जोडलेले असल्याचे पुरावे पोलिसांना मिळाले आहेत. याशिवाय विदेशी निधीची बाबही समोर आली आहे. पोलिसांना अनेक बँक खातीही मिळाली आहेत. त्याचबरोबर काही बेकायदेशीर अॅप्सच्या माध्यमातून लहान मुलांना शिकार बनवण्याचे प्रकरणही समोर आले आहे. बद्दोने आतापर्यंत किती मुलांचे धर्मांतर केले आहे, हे जाणून घेणे पोलिसांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण आतापर्यंत शेकडो मुलांचे धर्मांतर झाल्याच्या बातम्या पोलिसांपर्यंत आल्या आहेत. दरम्यान पोलिसांनी अटक केलेल्या मौलवी अब्दुल रहमाननेही अनेक खुलासे केले आहेत.

## कल्याण पूर्वेत पूर्ववैमनस्यातून

उल्हासनगरात गुन्हा दाखल रविवारी रात्री जयेशने अमोलच्या हालचालींवर पाळत ठेऊन त्याला वस्तीत गाठून त्याची हत्या केली. हत्येनंतर जयेश पळून गेला. कोळसेवाडी पोलिसांना या प्रकरणाची माहिती अमोलच्या कुटुंबीयांनी दिली. पोलिसांनी तात्काळ तपास सुरू करुन आरोपी जयेशला अटक केली. कोळसेवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेंद्र देशमुख या प्रकरणाचा तपास करत आहेत. कल्याण पूर्व भागातील वाढत्या गुन्हेगारी हालचालींमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

## लाखो रुपये किमतीचा गहाळ

शाखेच्या दोन वेगवेगळे पथके तयार करण्यात आली. सदर खबर देणार यांचे राहते घर ते फाऊटंन हाटेल असे सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे खबर देणार यांचे ०८ तोळे सोन्याचे दागिने व ५०,०००/ रुपये रोख रक्कम असा एकुण ०४,५५,०००/ रुपये किंमतीचा मुद्देमाल वर नमुद खबर देणार यांच्याकडे खात्री करुन ताब्यात देण्यात आला आहे. सदरची कामगिरी श्रीमती पौर्णिमा चौगुले श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २ वसई, श्रीमती पद्मजा बडे सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई विभाग यांचे मार्गदर्शनाखाली नायगाव पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रमेश भामे, पो.नि. श्री. मिलींद साबळे (गुन्हे), गुन्हे प्रकटिकरण शाखेचे स.पो.नि. संतोष सांगवीकर, देवरे, पो.हवा. देविदास पाटील, पो.अंम. सचिन मोहीते, चेतन ठाकरे, सचिन खताळ, जयवंत खंडवी, अमर पवार, अशोक पाटील यांनी केली आहे.

## बाप रे ! आता या पोलिसांनी करायचे काय?

३० ते ३५ वर्षा पासून पोलीस कुटुंबिय या वसाहतीत राहत आहेत. आता अचानक घरं कशी खाली करायची? असा सवाल पोलीस कुटुंबियांनी सरकारला केला आहे.पोलिसांना मोफत घरे नाहीच!पुनर्विकास प्रकल्पात असणाऱ्या पोलिसांच्या या घरांचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे.

## ४ करोड रुपयांची खंडणी मागणा-या

टाकु अशी धमकी दिलेबाबत फिर्या दीनामे श्री. मनोज आत्माराम त्रिवेदी, रा. मालाड पुर्व, मुंबई यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पेल्हार पोलीस ठाणेत गु.रजि. नं. 1 ५३०/२०२३, भा.दं.वि.सं. कलम ३६४(ए), ३८४, ३८५, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेवुन सदर गुन्हा उघडकीस आणण्याकरीता वरिष्ठांनी गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांना सुचना व मार्गदर्शन केले होते. त्याप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी खान कंपाऊन्ड, पेल्हार येथे सापळा रचून आरोपीत नामे १) पद्युम्न मुन्नालाल गुप्ता ऊर्फ डेव्हीड, वय २४ वर्षे, २) प्रदीपकुमार मुन्नालाल गुप्ता ऊर्फ विजय शंकर, वय २३१ वर्षे, ३) अनुपकुमार मुन्नालाल गुप्ता, वय २० वर्षे, सर्व रा. साई चाळ, उमर SHS, सांगपाडा, नालासोपारा पुर्व मुळ रा. ता. मेजा, जि. प्रयागराज, राज्य उत्तरप्रदेश यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडुन गुन्हयातील २९,०००/ रुपये रक्कम मोबाईल फोन, चाकु, वाकीटाकी असा एकूण ३६,५००/ रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. सदर गुन्हयाच्या तपासात मुख्य सुत्रधार आरोपीत क्र. १ असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पेल्हार पोलीस ठाणेचे श्री. वसंत लब्दे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पो.नि. श्री. महेंद्र शेलार (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पो.उप.नि. सनिल पाटील, पो.हवा. योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, पो.अंम.रवि वानखेडे, किरण आव्हाड, निखिल मंडलिक, संजय मासाळ, अनिल साबळे, दिलदार शेख तसेच पोलीस उप आयुक्त परिमंडळ ३, विरार कार्या लयातील पो.हवा. नामदेव ढोणे, पो.अंम. सोहेल शेख यांनी केली आहे.

## पालघर पोलिसांकडून अंमली पदाथार्ची

श्री.अनिल विभुते, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांना कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानुसार श्री. अजव वसावे, पोलीस निरीक्षक, तलासरी पोलीस ठाणे व श्री. अनिल विभुते, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांनी संयुक्तरित्या पोलीस पथक नेमून सदर पथकास उमरगाव-तलासरी रोडवर नाकायंदी लावण्यास सांगीतले. नाकायंदी दरम्याण उमरगाव बाजूकडून तलासरी बाजुकडे जाणारी मोटार सायकल क्र.१५ ही.जे ८३३२ हीचेवरुन दोन इसम १) बाथु आनंद उमानत सिंग वय ४० वर्षे २) रमेश मोहन दुबळा वय ४० वर्षे, दोन्ही रा. नवी नगरी, भाटी रोड, भारूच्या तबेलाजवळ, सोलसुभा, उमरगाव, ता उमरगाव, जि बलसाड, राज्य गुजरात हे त्यांचे मध्यभागी सफेद रंगाची प्लास्टिकचे गोणीमध्ये अंमली पदार्था चीवाहतुक करीत असताना मिळून आले. सदर गोणीमध्ये चेक केले असता त्यामध्ये वेगवेगळया ५ पॅकेटमध्ये एकूण १,९८,६००/र किमतीचा ९ किलो ९३० ग्रॅम वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ मिळून आला. नमूद दोन्ही आरोपीस अटक करण्यात आले असून त्यांचेविरूध्द तलासरी पोलीस ठाणे येथे ग १५४/२०२३ गुंगीकारक औषधी द्रव्ये आणि मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम ८(ब),२०(ब) (२), २९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढिल तपास हा पोनि/अजव वसावे, तलासरी पोलीस ठाणे हे करीत आहेत. सदरची कामगिरी श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर वांचे आदेशान्वये श्री. पंकज शिरसाट, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. संडीष पिंपळे, उपविभागीय पोलीस अधिकारी, डहाणु विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. अजय वसावे, पोलीस निरीक्षक, तलासरी पोलीस ठाणे, श्री. अनिल विभुते, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, पालघर तमेच तलासरी पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हे शाखा, पालघर येथील पोलीस अंमलदार यांनी संयुतीक यवशस्विरित्या पार पाडली आहे.



संपादकीय...

# ही दंगल नव्हेच..

आता दिसतो आहे तो कुणाकुणाच्या कुरापतींविरुद्ध बहुसंख्यांच्या सामाजिक शक्तीचा हुंकार! पण कुरापत कोण कशाला काढेल, हे सत्ताधाऱ्यांना अजिबात नका विचारू..'दंगल होत नाही, घडवली जाते' हेच मुळात मिथक, तेही अलीकडे जरा जास्तच बावचळलेल्या पुरोगाम्यांनी लोकप्रिय केलेले.. त्यात अजिबात तथ्य नाही हे काय सांगायला हवे? त्यामुळे असल्या मिथकावर विश्वास ठेवून घाबरून जाण्याचे काही कारण नाही. दंगल हा अनेकदा बहुसंख्याकांच्या तर काही वेळा अल्पसंख्याकांच्या धर्म विषयक भावनांचा उत्स्फूर्त आविष्कार असतो. आता काही जण याला वेडेपणा म्हणतील. म्हणू द्या की त्यांना. त्याने काय फरक पडतो? शेवटी लोकांची व त्यातल्या त्यात बहुसंख्यांची भावना महत्त्वाची. अशा लोकभावनांची कदर करणे हे सरकारचे कर्तव्यच. त्यामुळे राज्यात जे घडते आहे त्याने विचलित होऊन जाण्याचे काहीही कारण नाही. तीन महिन्यांत आठ दंगली हे त्राशिक तर मांडूच नका. ती उत्तरेकडची राज्ये बघा. कशा दंगली व्हायच्या तिकडे. एकापाठोपाठ एक. तेही काँग्रेसच्या काळात. फायदाच मिळायचा ना तेव्हा त्या पक्षाला. मग तेच धोरण धर्म बदलून आता राबवले तर त्यात वाईट काय? आणि हे गृह खात्याचे अपयश वगैरे तर अजिबात नाही. धर्माच्या बाबतीत लोकच संवेदनशील झाले असतील, भावना दुखावणाऱ्या गोष्टी ते अजिबात सहन करायला तयार नसतील तर त्याला खाते तरी काय करणार? त्यामुळे दंगली होतच राहतील. त्यांनी अनिष्ट वळण घेऊ नये याची काळजी सरकार घेईल. बरे या अनिष्ट वळणाची व्याख्याही सोपी आणि सुटसुटीत आहे- 'आपले' नुकसान झालेच नाही, तर वळणही अनिष्ट नसतेच. या दंगलीच्या मागे सत्ताधारी पक्षाचे लोक आहेत, या आरोपात तर अजिबात तथ्य नाही. काहीच काम नसलेले विरोधक असे काहीबाही बोलत असतात. सकारात्मक काही दिसतच नाही या विरोधकांना. तेव्हा आधी सकारात्मक म्हणजे काय, हे पाहू.

औरंगजेबाने मंदिरांसोबत मशिदीही पाडल्या.. इंग्रजांशी अखेरपर्यंत, प्राणपणाने लढणारा टिपू हा निधर्मी राजा होता.. हा झाला नकारात्मक इतिहास. सकारात्मक दृष्टीने त्याचे पुनर्लेखन चालू आहे, हे माहीत असूनसुद्धा त्या इतिहासाचे 'स्टेट्स' ठेवण्याची काहींची हिंमत होतेच कशी? व्यक्तिस्वातंत्र्य, मूलभूत अधिकार असले मुद्दे न्यायदानाच्या पायरीपर्यंतच ठीक. समाजात गुण्यागोविंदाने राहायचे असेल तर बहुसंख्याक आणि त्यांना हवे असलेले राज्यकर्ते म्हणतील तसेच राहावे लागेल, हे मान्य करणे म्हणजे सकारात्मकता. या जुन्या धर्म वेड्या शासकांचा इतिहास पुसून टाकण्याची प्रक्रिया सुरू असताना असे वागणे म्हणजे सरकारांना आव्हान देण्यासारखेच. मग ते राज्यकर्त्यांनी व त्यांच्या पाठीशी ठामपणे उभ्या असलेल्या बहुसंख्यांनी का म्हणून सहन करायचे? या सहन न होण्यातून तणाव निर्माण होत असेल, दगडफेक, जाळपोळ केली जात असेल तर तो या साऱ्यांचा दोष असूच शकत नाही. याला जबाबदार आहेत ते फक्त आणि फक्त असे स्टेट्स ठेवणारेच. काही विरोधक तर, 'स्टेट्सवाले आताच अचानक कसे उगवले? त्यांना कुणाची फूस आहे?' असले प्रश्नही विचारू लागले आहेत. त्यांच्या समाधानासाठी देऊ हवे तर, गुप्तचर यंत्रणेला काम. मग मिळतील उत्तरे यथावकाश. घाई काय आहे त्यात? दंगलीमागील खऱ्या सूत्रधाराला शोधून काढायला उशीर लागला तर हे लोण राज्याच्या इतर भागांत पसरेल, आणखी अशांतता निर्माण होईल असा भीतीचा बागुलबुवा उभा करण्याचे काही कारण नाही. कारण मुळात ही दंगलच नाही, हा आहे उत्स्फूर्त आविष्कार. त्यातून योग्य तो संदेश संबंधितांपर्यंत पोहोचला की आपसूकच शांतता निर्माण होते.

केवढे सामाजिक सामर्थ्य आहे या उत्स्फूर्त आविष्कारात! त्यानेच तर अल्पसंख्याकांमध्ये जरब व बहुसंख्याकांचे एकीकरण हा उद्देश साध्य होतो. तरीदेखील काही जण म्हणतात की हे सारे सत्तेसाठी सुरू आहे, निवडणुका जिंकण्यासाठी आहे. इतके अल्प उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून कधीच कोणता राजकारणी काम करत नाही. विद्यमान राज्यकर्ते तर नाहीच नाही. बहुसंख्याकवादाची भावना पुरेपूर रुजवून जागतिक पातळीवर देशाला नाव मिळवून देण्याच्या विशाल हेतूनेच हे सारे कामाला लागले आहेत. दुर्दैव हे की विरोधक हा विशाल हेतू लक्षातच घेत नाहीत- दंगल, सामाजिक सौहार्द असे जुनेच मुद्दे काढत राहतात. अशा संकुचित दृष्टिकोनाकडे समाजाने दुर्लक्षकरणेच योग्य. 'दंगलीमुळे आर्थिक नुकसान होते. व्यवहार ठप्प होतात. समाजात एकमेकांकडे संशयाने बघण्याची वृत्ती बळावते. सलोखा नाहीसा होतो..' ही निरीक्षणेसुद्धा नव्या भारतात खोटीच ठरतील. खरे नाही वाटत? मग राज्यात या प्रकाराला जिथून सुरुवात झाली ते अमरावती बघा. कसे शांत शहर झाले ते. तेच दृश्य इतर सात शहरांतसुद्धा लवकरच दिसेल. उलट असे काही घडले की दोन्ही वर्गातील लोक एकत्र येतात. शांतता राखण्याच्या आणाभाका घेतात. कुणी 'स्टेट्स'सारखी कुरापत केली अथवा धर्म गुरूंची विटंबना करण्याचा प्रयत्न केलाच तर एकमेकांना आधी कळवायचे. कुणीही वाकडे पाऊल उचलणार नाही याची काळजी घ्यायची असा विश्वास एकमेकांना दिला जातो. प्रत्येक ठिकाणच्या शांतता समित्यांना कमालीचे महत्त्व प्राप्त होते. त्यात सक्रिय असलेल्या सर्व धर्मीयांचा समाजातला सन्मान वाढतो. नवे नेतृत्व पुढे येते.. हेच खरे सौहार्द, पण याकडे लक्ष न देता विरोधक जर राज्यकर्त्यांनाच दोष देत असतील तर कठीणच. 'उत्स्फूर्त आविष्कारा'त जे काही नुकसान होईल,

# महारेराविरोधात प्रक्षोभ का?

विकासकांची मनमानी ही याआधीही आश्चर्याची बाब कधीच नव्हती. महाराष्ट्र ओनरशिप ऑफ फ्लॅट अ‍ॅक्ट म्हणजेच मोफा असूनही कधी विकासकांवर जरब बसवता आली नाही. नाही म्हणायला राज्य व राष्ट्रीय ग्राहक निवारण मंच होते. विकासकांच्या विरोधात आदेशही जारी होत होते. पण अंमलबजावणी शून्य. किंबहुना वरच्या न्यायालयातून तांत्रिक कारणास्तव स्थगितीची शक्यताच अधिक. त्यामुळे विकासकांवर वचक बसविण्यासाठी २०१२ मध्ये महाराष्ट्र गृहनिर्माण नियमन आणि विकास कायदा (महाराष्ट्र हौसिंग रेग्युलेशन अ‍ॅक्ट) आणण्यात आला. या कायद्यामुळे मोफा कायदा रद्द झाला. पण कालांतराने विकासकांवर नियमन आणणारा कायदा केंद्राने स्थावर संपदा कायद्याच्या (रेरा) स्वरूपात आणला. त्यामुळे महाराष्ट्र गृहनिर्माण नियमन व विकास कायदा रद्द झाला. पण मोफा मात्र पुन्हा कायम राहिला. पण विकासकांवर मात्र जरब कुठल्याच कायद्याला आणता आली नाही.

महाराष्ट्र स्थावर संपदा प्राधिकरण म्हणजेच महारेराची स्थापना होऊन सहा वर्षे झाली तरी या प्राधिकरणाचाही विकासकांना धाक वाटत नाही, असे चित्र सध्या तरी निर्माण झाले आहे. याचे कारण म्हणजे गेल्या सहा वर्षांतील महारेराची कारवाई पाहिली तर ती बहुतांश विकासकांना झुकते माप देणारी आहे. आताही 'तारीख पे तारीख'चा अनुभव सामान्य खरेदीदारांना येत आहे. त्यामुळे महारेरावरचा विश्वासचही उडत चालला आहे का, अशी शंका निर्माण झाली आहे.

'लोकसत्ता'ने अशा पिचलेल्या खरेदीदारांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले आणि तक्रारींचा पाऊस पडला. सर्वच तक्रारी या साधारण समान होत्या. त्यामध्ये महारेराविरुद्ध प्रक्षोभ व्यक्त करण्यात आला आहे. महारेरा न्याय देणार नसेल तर आम्ही करायचे काय? न्यायालयात लागणारा वकिलांचा खर्च परवडणारा नाही, असे अनेकांचे म्हणणे. मनमानी व बिनधास्तपणे प्रकल्पांना मुदतवाढ घेणे हीच पद्धत सर्वच विकासकांची आहे. महारेराकडूनही मागचा पुढचा विचार न करता वर्षभराची मुदतवाढ दिली जात आहे. विकासक जगला तर खरेदीदार जगेल, अशी त्या मागची महारेराची अप्रत्यक्ष भावना असल्याचे सांगितले जाते. महारेराचे कथित सल्लागार विकासकांना बिनधास्तपणे वर्षभराची मुदत सहज मिळेल, असे ठामपणे सांगत होते. सुनावणीला लागत असलेल्या अमर्याद विलंबामुळे महारेराचीही या विकासकांना साथ तर नाही ना, अशीच परिस्थिती निर्माण झाल्यासारखे भासत होते. याच पानावर महारेराचे म्हणणे प्रसिद्ध करण्यात आले असून त्यात त्यांनी यामागील विलंबाची कारणे स्पष्ट केली आहेत. महारेरात सुनावणी वर्ष ते दोन वर्षे चालते. निकाल आला तरी त्याच्या अंमलबजावणीची खात्री नाही, अशीच स्थिती मोफाच्या वेळीही होती व आजही आहे, असेच खेदाने म्हणावे लागते. आज किमान जाब विचारण्यासाठी महारेरासारखी यंत्रणा ती अस्तित्वात आहे, एव्हढाच काय तो दिलासा.

'लोकसत्ता'कडे आलेल्या तक्रारींचा आढावा घेतल्यानंतर त्यात महारेराने काहीच केले नाही वा मनमानी केली, अशी खंत आढळून येते. काही प्रकरणात खूप विलंबाने आदेश दिले ही वस्तुस्थिती आहे. या आदेशाची



अंमलबजावणी न करण्याची हिंमत विकासकांनी दाखवली. मात्र अशा विकासकांवर कायद्यातील तरतुदीप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्याची हिंमत महारेराकडून सरसकट दाखविली जात नसल्यामुळे विकासक मुजोर झाले आहेत. विकासक जगले पाहिजेत. त्यांना दाबण्याची गरज नाही. पण हेच विकासक मुजोरी करतात त्याचे काय? नियामक यंत्रणा आहेत म्हणून त्यांना थोडा तरी लगाम आहे. त्यामुळे नियामक यंत्रणांनी त्याचप्रमाणे वागले पाहिजे. विनाकारण विकासकांची बाजू घेण्यात अर्थ नाही. विकासकांनी महारेराच्या नियमांचे पालन केलेच पाहिजे.

१ मे २०१७ मध्ये स्थापन झालेल्या महारेराने सुरुवातीपासून या विकासकांवर वचक ठेवण्याचा प्रयत्न केला नाही. करोना आल्यामुळे महारेरा अधिकच नरम झाले. त्याचा पुरेपूर फायदा उठवत विकासकही आपल्या प्रकल्पाची ताबा तारीख वाढवत राहिले. आता कुठे सहाव्या वर्षांत नव्या महारेरा अध्यक्षांनी सुरुवातीपासूनच कठोर भूमिका घेतली आहे. महारेरा नियमांचे विकासकांनी काटेकोर पालन केले तर महारेरा म्हणते त्याप्रमाणे तक्रारींचे प्रमाण कमी होऊ शकेल. मात्र शून्य तक्रारी ही अशक्यप्राय बाब वाटत आहे.

'लोकसत्ता'कडे आलेल्या खरेदीदारांच्या तक्रारीमधून अनेक मुद्दे पुढे आले. विकासकाने घराचा ताबा दिलेला नाही, ताब्याची तारीख वाढविली, सबव्हेन्शन योजनेत आता विकासक कर्जाचे हप्ते भरण्यास नकार देत आहे, महारेरापुढे सुनावणी झाली, पण आदेश नाही, आदेश आला पण अंमलबजावणी नाही अशाच आशयाच्या या तक्रारी आहेत. आयुष्यभराची पुंजी हक्काच्या घरासाठी लावली. पण वर्षांमागून वर्षे उलटली तरी घराचा ताबा मिळत नाही, ही सर्वांचीच कैफियत आहे. आम्हाला कोणी वाली नाही, अशी त्यांची भावना आहे. आमचे प्रश्न सोडवण्यासाठी महारेराकडून प्रयत्नांची पराकाष्ठा होत नाही, असे त्यांचे म्हणणे आहे.

प्रलंबित तक्रारी मार्गी लावण्यासाठी महारेराने पावले उचलायला हवीत अशी संबंधितांची मागणी आहे. सुरुवातीच्या काळात महारेरातील कर्मचारी वर्ग खूपच कमी होता. अजोय मेहता महारेरा अध्यक्ष झाल्यानंतर त्यांनी त्यांच्यासोबत महापालिकेत महत्त्वाच्या पदावर असलेल्या बहुतांश सेवानिवृत्तांची वर्णी लावली आहे. अनेक कायदा अधिकारी नेमले आहेत. रखडलेल्या प्रकल्पांच्या पुनरुत्थानासाठी माजी अतिरिक्त पालिका आयुक्त संजय देशमुख यांची नियुक्ती केली आहे. पण तक्रारी वेगाने मार्गी लागतील यासाठी काहीही करीत नसल्याची लोकांची भावना आहे. याबाबत महारेराने आपली सविस्तर भूमिका मांडली आहेच. पण ज्यांच्याकडे आशेने पाहायचे त्या महारेराकडून अपेक्षांची पूर्ती होत नाही, अशी पिचलेल्या खरेदीदारांची धारणा आहे. महारेराने याचा गांभीर्याने विचार करायला हवा. महारेराकडून विकासकांविरुद्ध कारवाई होण्यास सुरुवात होईल तेव्हा खरेदीदारांनाही विकासक गांभीर्याने घेतील. तेव्हाच महारेरापुढील तक्रारी कमी होतील.

'रेरा कायद्यात अशी तरतूद आहे की, नैसर्गिक न्यायानुसार तक्रारीचा लवकरात लवकर निपटारा व्हावा. महारेराचे माजी विधि सल्लागार वाचासुंदर यांच्या मते, खरे तर महारेरा खंडपीठाला तक्रारी निकालात काढण्यास अजिबात वेळ लागता कामा नये. दोन्ही बाजू ऐकून घेऊन संबंधित कागदपत्रे तपासली तरी एक दोन सुनावणीत निकाल देता येऊ शकतो. त्यामुळे इतका वेळ का लागतो हे कोडेच आहे. 'सलोखा मंचासारख्या यंत्रणेचा महारेराने प्रभावी वापर करून घेतला पाहिजे. सलोखाचे तब्बल ६० हून अधिक मंच राज्यात आहेत. त्यांना अधिकार दिले पाहिजेत, असे मत महाराष्ट्र सोसायटी कल्याण संघाचे अध्यक्ष रमेश प्रभू यांनी व्यक्त केले.

'तक्रारी सध्या ऑनलाइन ऐकल्या जातात. त्यामुळे महारेराची खंडपीठे वाढविण्यात काहीच अडचण येऊ नये, असे मत मुंबई ग्राहक पंचायतीचे कार्याध्यक्ष अ‍ॅड. शिरीष देशपांडे यांनी व्यक्त केले. सलोखा मंचाची प्रकरणे निकाली काढण्याचे प्रमाण ३५ टक्क्यांवर आले आहे. पूर्वी हे प्रमाण ७५ टक्के होते. महारेराने प्रलंबित तक्रारी पाठविण्यास सुरुवात केल्यानंतर हे प्रमाण घसरले. सलोखा मंचात वकिलांची गरजच नसते. संबंधित दोन्ही पक्षकार समोरासमोर बसून मार्ग काढतात. परंतु वकिली संभाषण सुरू झाल्याने सलोखा मंचातही तक्रारी प्रलंबित राहू लागल्या.

# ते बाहुबली; पण त्याही लिंबूटिंबू नाहीत..

भाजपला अनुराग ठाकूर यांचे कौतुकच वाटत असल्यास नवल नाही. हे ठाकूर यापूर्वी केंद्रीय अर्थखात्यात राज्यमंत्री पदावर होते आणि तेव्हा 'नागरिकत्व (दुरुस्ती) कायद्या'च्या विरोधातील आंदोलकांबाबत 'गोली मारो' असे आवाहन आपल्या पाठीराख्यांना करत होते. दिल्ली उच्च न्यायालयातील, न्यायाची चाड असलेल्या कुणा न्यायाधीशांनी अनुराग ठाकूर आणि अन्य दोघा भाजप नेत्यांवर, ईशान्य दिल्लीत हिंसाचाराला चिथावणी दिल्याबद्दल तक्रार दाखल करून घेण्याचे आदेश दिल्ली पोलिसांना दिले होते. संबंधित न्यायाधीशांनी ही तक्रार दाखल होण्यासाठी कालमर्यादा नेमून दिली होती, ती मुदत संपण्याच्या एक तास आधी त्या न्यायाधीशांचीच बदली रातोरात पंजाब उच्च न्यायालयात करण्यात आली. न्यायाधीश गेले चंडीगडला. ठाकूर दिल्लीत तर राहिलेच, वर त्यांना पुढल्या वेळी बढतीदेखील देण्यात आली. आता ठाकूर हे राज्यमंत्रीच असले, तरी त्यांच्याकडे क्रीडा खात्याचा स्वतंत्र कार्यभार सोपवण्यात आलेला आहे.

ठाकूर यांच्या गुणांबद्दल किंवा क्षमतांबद्दल शंका घेण्याचे काहीही कारण नाही. परंतु पक्ष आणि शीर्षस्थ नेते याबद्दलची निष्ठा सिद्ध करण्यास ते फार आतुर दिसतात. आंतरराष्ट्रीय पदकविजेत्या महिला कुस्तीपटू आणि इतर काही महिला कुस्तीपटूंनी (सात जणी) भाजप खासदार आणि भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष ब्रिजभूषण शरण सिंह यांच्यावर विनयभंगाचा आरोप केल्यानंतर अनुराग ठाकूर यांना निष्ठा व्यक्त करण्याची जणू आणखी एक संधीच मिळाली.

या महिला कुस्तीपटूंच्या तक्रारींमधून खासदार ब्रिजभूषण शरण सिंह यांच्या वागण्याची एक पद्धत दिसून आली. ती म्हणजे महिला कुस्तीगिरांना विनंती न करताच त्यांनी अंगात घातलेले टी-शर्ट वर करणे, आधी त्यांच्या उघड्या पोटावर हात ठेवणे आणि नंतर ते त्यांच्या स्तनांकडे सरकवणे! ते नेहमी असेच करत असल्यामुळे या मुली काही ना काही कारण सांगून त्यांना टाळत आणि आपली सुटका करून घेत. पण मग त्यांनी या मुलींना आपल्या कार्यालयात बोलवायला सुरुवात केली. ब्रिजभूषण शरण सिंह यांनी काही मुलींना सांगितले की लैंगिक सुखाच्या बदल्यात ते त्या मुलींना खेळाडूंना घ्यावी लागतात ती सप्लीमेंट्स त्यांच्या स्वतःच्या खर्चाने देतील. याचा अर्थातच त्या मुलींना धक्काच बसला.

ब्रिजभूषण शरण सिंह यांच्याशी गाठ पडू नये म्हणून या मुलींनी सगळ्यांसाठी जिथे जेवणाची व्यवस्था असते, त्या हॉलमध्ये मुलींपैकी कुणीही एकटीने जायचे नाही, असा निर्णय घेतला. आपली क्रीडा कारकीर्द ब्रिजभूषण शरण सिंह यांच्या हातात आहे याची त्यांना जाणीव होती. पदकविजेती कुस्तीपटू विनेश फोगट आणि साक्षी मलिक यांनी हा प्रश्न धसास लावायचा असे ठरवून हातात घेतला आणि विनेशचा मेहुणा पदकविजेता बजरंग पुनियादेखील त्यांना सामील झाला तेव्हा कुठे खासदार ब्रिजभूषण सिंह यांचे खरे रूप समाजापुढे आले.

ब्रिजभूषण सिंह यांनी नवीन कुस्तीपटू मुलींना संध्याकाळनंतर उशिरा 'ओळख करून घेण्यासाठी' आपल्या घरी बोलावल्याचे वृत्त प्रसारमाध्यमांमध्ये प्रसिद्ध झाले होते. या घटनेची चौकशी करण्यात आली नाही कारण सिंह यांना फक्त त्या एकाच मुद्द्यावर फेडरेशनच्या अध्यक्षपदावरून काढून टाकले गेले असते. दखलपात्र गुन्ह्यातील आरोपी असलेल्या महिलांना संध्याकाळनंतर ठाण्यात बोलावण्याची परवानगी पोलिसांनाही नाही आणि इथे तर कुस्ती महासंघाचे अध्यक्ष तरुण मुलींना त्यांच्या झोपेच्या वेळी



आपल्या घरी बोलावत होते.

क्रीडामंत्र्यांनी सुरुवातीला आपल्या पक्षातील या सहकाऱ्याला वाचवण्याचा प्रयत्न केला याबाबत माझ्या मनात कोणतीच शंका नाही. राज्यसभा खासदार म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल पदकविजेती महिला बॉक्सर मेरी कोम आणि भारतीय ऑलिंपिक समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल प्रसिद्ध धावपटू पी. टी. उषा या भाजपच्या ऋणात आहेत, हे समजण्यासारखे आहे. साहजिकच त्यांनी त्या स्वतः क्रीडा क्षेत्रातील असूनही या क्रीडापटू महिलांबाबत गुळमुळीत भूमिका घेतली. त्याच कशाला, अगदी बीसीसीआयचे अध्यक्ष रॉजर बिन्नी यांनीदेखील १९८३ मध्ये विश्वचषक जिंकलेल्या भारतीय क्रिकेट संघातील क्रिकेटपटूंनी महिला कुस्तीपटूंना दिल्या गेलेल्या वागणुकीचा निषेध केला तेव्हा, आपला पाठिंबा दिला नाही.

सरकार आणि अनुराग ठाकूर यांनी हे लक्षात घेतले पाहिजे की भारतीय जनतेला हे माहीत आहे की या कुस्तीपटू मुलींनी जे काही केले ते त्यांना भाजपला विरोध करायचा होता, म्हणून केलेले नाही. आणि त्यांनी जे सत्य मांडले ते मांडण्यासाठी खरोखरच मोठ्या धैर्याची गरज होती. ब्रिजभूषण सिंह हे सत्ताधारी पक्षाचे खासदार आहेत म्हणून त्यांचे संरक्षण केले जात आहे, ते विरोधी पक्षाचे खासदार असते तर ते एव्हाना तिहार तुरुंगात असते, ही गोष्ट २०१४ आणि २०१९ मध्ये मोदींना मोठ्या प्रमाणावर पाठिंबा देणाऱ्या महिला मतदारांना समजली तर त्या २०२४ मध्ये वेगळ्या कुणाला तरी मतदान करू शकतात.

आता थोडा दिल्ली पोलिसांचा विचार करू. पोलिसांवर टीका करायला आपल्याकडे सगळ्यांनाच आवडते. पण सत्ताधारी पक्षाचे आमदार - खासदार आणि सरकार समर्थक यांच्या बाबतीत मवाळ भूमिका घेणारे पोलीस विरोधी पक्षाच्या नेत्यांवर आणि सत्ताधाऱ्यांच्या पक्षातील चुकार टीकाकारांवर हात उगारायला इतके का उत्सुक असतात, याचे विश्लेषण टीकाकारांनी केले आहे का? आजचा काळ असो किंवा मी काम करत होतो तो काळ असो, सत्तेत असलेला पक्ष मग तो भाजप असो किंवा काँग्रेस, सरकारी अधिकाऱ्यांवर सत्ता गाजवू पाहतो. केवळ बदल्या आणि नेमणुका एवढ्याच गोष्टी राजकीय लोकांच्या हातात असतात असे नाही. त्याव्यतिरिक्तही गुणवत्ता हा मुद्दा बाजूला ठेवून ते एखाद्या अधिकाऱ्याला भराभर वर उचलू शकतात आणि एखाद्या अधिकाऱ्याला विजनवासात पाठवू शकतात.

आज, अगदी चांगले अधिकारीदेखील जोखमीच्या कामगिऱ्यांपासून स्वतःला नामानिराळेच ठेवण्याचा प्रयत्न करतात. त्यांना अशी कामे स्वीकारण्यास भाग पाडले तर त्यांना अस्तित्वासाठी तडजोड करावी लागण्याची शक्यताच अधिक! एखाद्याच्या राजकीय वरदहस्ताने काम करणारे पोलीस संबंधिताच्या इशाऱ्यामुळे आपल्याला एखाद्या अगदी स्वच्छ प्रकरणातही अडकवायला कमी करणार नाहीत, हे ज्यांना माहीत आहे, त्यांच्या मनात याबाबत कसलीच शंका नाही.

एका अतिशय फालतू विनोदासाठी राहुल गांधींना कोर्टात खेचण्यात आले. 'आप'चे दोन मंत्री तर तुरुंगात गेले. आणि भाजपचे म्हणणे आहे की कुणीही, अगदी कुणीही कायद्यापेक्षा मोठा नाही. तुम्ही भाजपमध्ये जाण्याचा तेवढा अपवाद! पण एखाद्या पदाच्या आमिषाने एवढे दिवस गप्प बसलेल्या नामवंत क्रिकेटपटू, मुष्टियोद्धे, महिला आणि पुरुष खेळाडूंनी आता कारवाईच्या मागणीच्या सुरात सूर मिसळला आहे. भाजपमध्ये खासदार असलेले एक जोडपेदेखील त्यांच्यात सहभागी झाले आहे. या सगळ्यांपेक्षा प्रबळ आहे ते सामान्य नागरिकांचे, विशेषतः महिला मतदारांचे सार्वत्रिक मत! 'लडके तो लडके होते है, गलती हो जाती है' असे म्हणणाऱ्या मुलायमसिंह यांचे कट्टर चाहतेच तेवढे भारतीय कुस्ती महासंघाच्या अध्यक्षांना माफ करतील.

एके काळी स्थानिक पोलिसांनी ज्याच्यावर 'गुन्हेगारी पार्श्वभूमी' असल्याचा ठपका ठेवला होता आणि टाडाअंतर्गत कारवाई केली होती, अशा ब्रिजभूषण सिंह यांच्यासारख्या गंभीर आरोप असलेल्या खासदाराविरुद्ध कारवाई केली जाण्याचे संकेत अनुराग ठाकूर यांनी अलीकडेच दिले आहेत. आधी महिला कुस्तीगिरांबाबत कठोर भूमिका घेणारे क्रीडामंत्री आता सामोपचाराच्या भूमिकेत दिसत आहेत.

क्रीडा मंत्रालय आणि पोलिसांकडून चौकशीला बराच उशीर झाला आहे. तक्रारकर्त्यांपैकी एका १७ वर्षांच्या अल्पवयीन मुलीने दंडाधिकाऱ्यांसमोर दिलेले निवेदन मागे घेतले आहे! आणखी उशीर झाला, तर आणखी तक्रारदार मागे फिरतील. कदाचित हादेखील 'नीती'चाच भाग असू शकतो. ब्रिजभूषण सिंह यांच्यासाठी गुन्हेगारी जगत हे काही नवीन नाही. त्यांच्या कारकीर्दीत याआधी ते अनेक खटल्यांतून सहीसलामत सुटले आहेत. पण महिला कुस्तीपटूदेखील ज्यांच्याकडे सहज दुर्लक्ष केले तरी चालेल, अशा कुणी लिंबूटिंबू नाहीत.

पोलीस
बातमी पत्र
संमिश्र
४
मुंबई, मंगळवार १३ ते १९ जून - २०२३

# कोल्हापुरात चोरी, घरफोड्यांचे सत्र सुरुच; टिकावने दरवाजा तोडून साडे सात लाखांचे दागिने लंपास

कोल्हापूर शहरासह जिल्ह्यात चोरी, घरफोड्यांचे सत्र सुरुच आहे. कोल्हापूर शहारातील जरगनगरमध्येच चार घरफोड्या झाल्या आहेत. करवीर तालुक्यातील कोपार्डेत व्यावसायिकाच्या घराचा दरवाजा टिकावने तोडून साडे सात लाखांचे दागिने लंपास करण्यात आले. इचलकरंजीमध्येही तीन चोरीच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे चोरी, दरोडे, घरफोड्यांनी अवघा जिल्हा भयभीत होऊन गेला आहे. जिल्ह्यात गेल्या चार महिन्यांपासून चोरीच्या घटना घडत असल्याने नागरिकांमध्ये



भीती पसरली आहे. टिकावने दरवाजा तोडून साते सात लाखांचे दागिने लंपास

करवीर तालुक्यातील कोपार्डेत टिकावने दरवाजा तोडून स्क्रॅप व्यावसायिकाच्या घराचा दरवाजा टिकावने तोडून नऊ तोळे दागिने आणि अडीच लाख रोख रकमेवर डल्ला मारला. व्यावसायिक विलास जगताप कोल्हापूरमध्ये विवाहासाठी आले असताना हा प्रकार घडला. चोरट्यांनी टिकावने दरवाजा तोडून घरात प्रवेश केल्यानंतर तिजोरी फोडून दागिने लंपास केले. घरातील दोन तिजोरी चोरट्यांनी फोडल्या. अन्य एक तिजोरी फोडण्याचा प्रयत्न करताना चाकू अडकून पडल्याचे निदर्शनास आले. कोपार्डेपासून हाकेच्या अंतरावर असेलल्या बांलिग्यामधील कात्यायनी ज्वेलर्समधील दरोडा ताजा असतानाच ही घटना घडल्याने दहशत निर्मा ण झाली आहे. जरगनगरमध्ये डा ॅलरवर डल्ला, एकाच रात्रीत चार घरात चोऱ्या कोल्हापूर शहरातील उपनगर असलेल्या जरगनगरमध्ये चार घरांमध्ये चोरीच्या घटना घडल्या. यामधील एका घरातील 450 डॉलर लंपास करण्यात आले. अन्य दुसऱ्या घरातील सोन्याचे दागिन्यांसह 61 हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास करण्यात आला.


# बुलढाणा जिल्ह्यात घातक शस्त्रांची तस्करी करणा-या रॅकेट सक्रिय; 14 देशी पिस्तुल, 25 मॅगझीन, 8 जिवंत काडतूस जप्त

बुलढाणा : ठाणे पोलिसांनी बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यातील सोनाळा पोलीस स्टेशन हद्दीत धडक कारवाई करून एकच खळबळ उडवून दिली आहे. ठाणे गुन्हे अन्वेषण विभागाच्या मालमत्ता गुन्हे शोध पथकाने संग्रामपूर तालुक्यातील टुनकी वसाली परिसरात छापा टाकून मोठ्या प्रमाणात अवैध शस्त्र साठा जप्त केला आहे. या कारवाईत 14 देशी पिस्टल, 25 मॅगझीन, आठ जीवंत काडतुसे जप्त केली आहे. त्यामुळे मध्य प्रदेशातून महाराष्ट्रात घातक हत्यार तस्करीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. बुलढाणा जिल्हा स्थानिक



गुन्हे अन्वेषण विभाग फक्त गुटखा कारवाईसाठी प्रसिध्द असल्याचं पुन्हा एकदा सिध्द झालं आहे. सोनाळा पोलिसांनी या कारवाईवर बोलने टाळले. यावेळी अटकेतील आरोपीच्या नातेवाईकांच्या घराची झडती घेण्यात आली. त्यादरम्यान यात मुख्य असलेला आरोपी तेरसिंग सिकलकार हा आढळून आला नाही. ठाणे पोलीसांनी घरजप्ती पंचनामा व फरार आरोपी तेरसिग यास हजर करण्यास निवेदन पत्र दिल्याची मोघम नोंद सोनाळा पोलीस स्टेशन मध्ये घेण्यात आली आहे.

# पडीक इमारतीत जाऊन पार्टी करणं जीवावर बेतलं, सातव्या मजल्यावरुन पडून तरुणीचा मृत्यू



पडीक इमारतीमध्ये जाऊन पार्टी करणं नवी मुंबईतील (Navi Mumbai) एका तरुणीच्या जीवावर बेतलं आहे. अंधारात अंदाज न आल्याने तरुणीचा तोल जाऊन ती सातव्या मजल्यावरुन कोसळली. यात तिचा जागीच मृत्यू झाला. तत्पूर्वी पोलिसांनी या प्रकरणी तिच्यासोबत दारु पित बसलेल्या दोन तरुणांना पोलिसांनी ताब्यात घेऊन त्यांची चौकशी सुरु केली आहे. यापैकी एक तरुण तिचा बॉयफ्रेण्ड असून दुसरा त्यांचा कॉमन फ्रेण्ड आहे. तरुणी खरंच पडली की तिची हत्या केली, याचा तपास पोलीस करत आहेत. नवी मुंबईतील एनआरआय पोलीस ठाण्यात हद्दीत बेलापूरमधील सेक्टर 15 मध्ये काल (8 जून) संध्याकाळी ही घटना घडली. एका पडीक इमारतीच्या सातव्या मजल्यावरुन पडून 19 वर्षीय तरुणीचा मृत्यू झाला. मृत तरुणी ही मूळची पनवेल इथली आहे. ती मागील दोन दिवसांपासून आपल्या मित्राच्या घरी राहत होती. काल मित्राने त्याच्या मित्राला घरी बोलावून पार्टी करण्याचा बेत आखला होता. परंतु घरात आई येईल या भीतीने तिघांनी बाहेर जाऊन पार्टी करण्याचा बेत केला. मग बेलापूरमधील एका पडीक इमारतीच्या सातव्या मजल्यावर जाऊन पार्टी तिघे जण बिअर पित होते. यावेळी तिचा प्रियकर लघुशंकेसाठी उठला. त्यानंतर तरुणीही त्याच्या मागे जात होती. परंतु अंधारात अंदाज न आल्याने तरुणीचा तोल जाऊन ती सातव्या मजल्यावरुन खाली पडली. यात डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने तिचा जागीच मृत्यू झाला आहे. तरुणीसोबत दारु पिणारे दोन्ही तरुण ताब्यात या घटनेची माहिती मिळताच एनआरआय पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

# मुंब्रा आता बनलाय मिनी पाकिस्तान

## आमदार नितेश राणे यांचा आरोप

'मुंब्रा आता पू र्वीचा मुं ब्रा राहिलेला नाही. आता तो मिनी पाकिस्तान बनलेला आहे. येथून आता हिंदूविरोधात काम होते आहे, याचे कोणीही समर्थन करायला नको. तिथले आमदार किं वा नगरसे वक यांनीही याचे समर्थन करायला नको. मुंब्र्यातून धर्मांतराचे काम सुरू आहे', असा आरोप भाजप आमदार निते श राणे यांनी रविवारी पत्रकारपरिषदेत केला. तथापि, मुंब्र्याला मिनी पाकिस्तान होण्यापासून वाचविण्यासाठी आमचे सरकार जे जे करणे शक्य आहे, ते करेल असा विश्वासही आमदार नितेश राणे यांनी यावेळी व्यक्त केला.

'केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी नां देड ये थे विचारलेले प्रश्न आणि मू ळ मु द्यांना उत्तर दे ण्याची हिंमत सं जय राऊत यांनी दाखवली नाही. हिंदुत्वाशी बेईमानी कोणी केली, कोणाचा राजकीय लव जिहाद झालेला आहे. हे बोलण्याची हिं मत राऊत यांनी ठे वली पाहिजे होती. अमितभाई शहा यांनी जे काही महत्त्वाचे मुद्दे मांडले, उबाठावाल्यांना जो प्रश्न विचारलाय त्याच्यावर उत्तर देण्याची हिं मत ते करणारच नाहीत. खासदार सुप्रिया सुळे यांचे हे लोक कालपासून अभिनंदन करत सुटलेत, त्या सुप्रिया सुळेताईंनी ट्रिपल तलाकचे समर्थन के ले आहे. यावर



उबाठावाल्यांची काय प्रतिक्रिया आहे', असा सवाल नितेश राणे यांनी उपस्थित केला.

'समान नागरी कायदा झाला पाहिजे आणि आम्ही तो आणणार आहोत, असे दे शाच्या गृ हमंत्र्यांनी काल नांदेडमध्ये ठणकावून सांगितले आहे. त्यावर उत्तर दे ण्याचे बळ राऊत आणि उद्धव ठाकरेंमध्ये आहे का? असा थेट सवालही राणे यांनी केला. अयोध्येमध्ये उभारण्यात येत असलेल्या भव्य राम मं दिराचा उल्लेख शहा यांनी केला आहे. त्यावरून महाविकास आघाडीच्या लोकांना सोबत घे ऊन तिथे जाऊन जितेंद्र आव्हाड, हसन मु श्रीफ, अबू आझमी यांनी समर्थन देण्याची हिंमत तुमच्यात आहे का? असा त्यांनी विचारला आहे.

'बाळासाहेबांच्या शब्दाला किंमत होती. त्यांचा शब्द बंदुकीच्या गोळीसारखा होता. एकदा निघाल्यावर परत कधी यायचा नाही. पण उद्धव ठाकरे यांनी शब्द दे ण्याचा काही सं बंध नाही. उद्धव ठाकरे यांनी उभ्या आयुष्यात कोणालाही दिलेला शब्द पाळलेला नाही. ना सामान्य शिवसैनिकाला, ना स्वतःच्या आमदाराला, ना स्वतःच्या खासदारांना आणि स्वतःच्या सख्या भावाला दिलेले शब्द कधी उद्धव ठाकरे यांनी पाळले नाहीत', असा आरोप त्यांनी के ला. तसे च उद्धव ठाकरे ज्या फायर आजीच्या घरी गेले होते, तिथे घरात जाऊन तुझ्या नातवाला नोकरी लावतो, असा शब्द मुख्यमंत्री असताना त्यांनी दिला होता. मात्र आजवर त्यांना नोकरी लावलेली नाही. त्या आजी परळमध्ये भाजी विकताहेत. उद्धव ठाकरे फक्त पाटणकरांना, सरदेसाई यांना दिलेला शब्द पाळतात. संजय राऊत यांच्यामध्ये हिंमत असेल, तर ट्रिपल तलाकप्रश्नी सुप्रिया सुळे, आणि समान नागरी कायद्यावर महाविकास आघाडीच्या बै ठकीत चर्चा घडवून आणावी. तसे च राम मं दिर तयार होईल, ते व्हा जितेंद्र आव्हाड, अबू आझमी यांच्याकडून महाआरती घडवून दाखवावी. संजय राऊत यांचा शिवसेनेच्या जडणघडणीत कसलाही संबंध नाही. त्यांनी आम्हाला शिवसेनेचे दाखले दे ऊ नयेत, असे बोलही त्यांनी सुनावले.

### वरळीच्या जागेचे बघा...

कालपासून कल्याण - डोंबिवलीच्या सीटबद्दल संजय राऊत खूप बडबड करत आहेत. त्यांना माझा थेट सवाल आहे की, वरळी विधानसभेतून २०२४ ला राष्ट्रवादीचा उमेदवार आहे की नाही? वरळीची सीट राष्ट्रवादीने उबाठाकडून मागितलेली आहे. आदित्य ठाकरे हे शिवडी मतदारसंघाची चाचपणी करत आहेत. वरळीच्या जागेवर सचिन अहिर यांचा हक्क होता, जेव्हा ते राष्ट्रवादीमध्ये होते. ते वारंवार जिंकत होते. हीच जागा आता राष्ट्रवादीने पुन्हा मागितली आहे. त्यामुळे संजय राऊत यांनी सांगावे की, आदित्य ठाकरे यांची सीट तुम्ही वाचवू शकत नाहीत, तर तुम्ही कल्याण-डोंबिवलीवर कोणत्या तोंडाने बोलत आहात? असा सवालही राणे यांनी उपस्थित केला. कल्याण-डोंबिवलीबद्दल काय करायचे ते आमचे प्रमुख नेते बसून ठरवतील. त्याची चिंता तुम्ही करू नका. पण २०२४ ला आदित्य ठाकरेंना स्वतःची सीटही निवडणूक लढवायला मिळत नाही, त्याबद्दल बोलण्याची हिंमत ठेवावी, असे आव्हान त्यांनी राऊत यांना दिले.

## सात महिन्याच्या मुलासह ३२ जखमी

# धारावी येथील इमारतीला आग

धारावी ये थील ९० फू ट मार्गावर असलेल्या तळ अधिक सात मजली शर्मा इमारतीत रविवारी सकाळच्या सुमारास भीषण आग लागली. या दुर्घटनेत सात महिन्यांच्या मु लासह ३२ जण जखमी झाले . त्यापैकी २९ जखमींना सायन रुग्णालय, तर ३ जखमींना धारावीतील आयुष्य रुग्णालयात दाखल करण्यात आले असून सगळ्यांची प्रकृती स्थिर असल्याचे रुग्णालय प्रशासनाकडून सांगण्यात आले.

धारावी ९० फूट रोडवर असलेल्या तळ अधिक सात मजली शर्मा इमारतीत रविवारी सकाळी ११ वाजण्याच्या सु मारास ही आग लागली. घटनेची माहिती मिळताच मुंबई अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घे त बचावकार्य सु रू के ले. मात्र या दुर्घटनेत ७ महिन्याचा रेहान शे ख व ५ वर्षांची मु लगी नादीया शे ख हिच्यासह ३२ जण जखमी झाले. जखमींची प्रकृती स्थिर असल्याचे रुग्णालय प्रशासनाकडून सांगण्यात आले.

दरम्यान, मुंबई अग्निशमन दलाने १२.३० वाजता आगीवर नियंत्रण मिळवले. या दुर्घटनेची स्थानिक पोलीस, जी उत्तर विभागाचे अधिकारी व अग्निशमन दलाचे अधिकारी चौकशी करत असल्याचे अग्निशमन दलाकडून सांगण्यात आले.

### जखमींची नावे

मस्तान शेख (३५), खाउनिसा (६०), रुखसाना शेख (२६), आयन मस्तान शेख (१५), निदा शेख (३०), सय्यद सलमाऊदीन ( ६७), सय्यद हिना ( २६), आयशा शेख (१६), तौसिफ (३५), रेहान शेख (एक महिने), नादिया शेख (५ वर्षे), मुस्कान शेख (३५), फरहान शेख (१०) व सना दळवी (२७), रेहान मस्तान (१७), नेहार शेख (११), कैफ शेख (८), नामिरा सय्यद ( १९), सानिया शेख (११), अफरान शेख ( ७), चांद शेख ( ४०), नसरीम्मा सय्यद (१९), उमा शेफीया (१०) असे एकूण ३२ जण या दुर्घटनेत जखमी झाले आहेत.

## मुख्यमंत्रीपदासाठी काँग्रेस - राष्ट्रवादीच्या मांडीवर बसणाऱ्या

# उद्धव ठाकरेंना धडा शिकवा

## केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे नांदेडकरांना आवाहन

**नांदेड :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावावर मते मागायची, त्यांच्या नावावर निवडून यायचे व सत्तेसाठी, स्वतःच्या मुख्यमंत्रीपदासाठी राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेसच्या मांडीवर जाऊन बसणाऱ्या उद्धव ठाकरे यांना धडा शिकवा, असे आवाहन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केले. भारतीय जनता पक्षाच्या महाजनसंपर्क अभियानाची सुरुवात मराठवाड्यातील नांदेडपासून आज झाली. त्यावेळी झालेल्या प्रचंड जाहीर सभेत कें द्रीय गृ हमंत्री अमित शहा यांनी काँग्रेस तसेच विरोधी पक्षांवर सडकून टीका केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील कें द्र सरकारच्या नऊ वर्षांच्या कारकिर्दीतील केलेल्या कामांचा लेखाजोखा जनतेसमोर मांडण्यासाठी भाजपच्या वतीने देशभरात महाजनसंपर्क अभियान राबविले जात आहे. कें द्र शासनाच्या विविध योजना जनतेपर्यंत पोहोचल्या की नाही तसेच जनतेकडून या याबाबत किती प्रतिसाद मिळत आहे, हे समजून घेण्याचा पक्षाचा प्रयत्न आहे. त्या दृष्टिकोनातूनच महाजनसंपर्क अभियानाची सुरुवात महाराष्ट्रातून सर्वप्रथम नांदेड येथून आज करण्यात आली. राज्याचे उपमुख्यमंत्री दे वेंद्र फडणवीस, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, महाजनसंपर्क अभियानाचे राज्यप्रमुख प्रवीण दरेकर तसे च जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्यासह भाजपच्या अनेक ने त्यांची तसे च खासदारांची व आमदारांची यावेळी प्रामुख्याने व्यासपीठावर उपस्थिती होती.

आपल्या भाषणात अमित शहा



महाराष्ट्रातून लोकसभेच्या ४५ जागा जिंकण्याचा भाजपचा संकल्प आहे, असे सांगून केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मराठवाडा व महाराष्ट्रातून सगळ्यांनी कमळाला पुन्हा संधी द्यावी, असे आवाहन केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताचे नाव जगात चमकत आहे... आजही पंतप्रधान नरेंद्र मोदी परदेशात गेल्यानंतर फक्त मोदी-मोदी असेच नारे लागतात. असे सांगून यापूर्वी सोनिया गांधी व मनमोहनसिंघ यांच्या भ्रष्ट सरकारने १२ लाख कोटींचे घोटाळे केले, असा

### लोकसभेच्या ४५ जागा जिंकण्याचा संकल्प

पुनरुच्चार केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज येथे केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा नऊ वर्षांचा पारदर्शी कारभार आहे. पुन्हा एकदा देशात भाजपची सत्ता येण्यासाठी महाराष्ट्रातून लोकसभेच्या सर्वाधिक जागा निवडून द्याव्यात असे आवाहन त्यांनी यावेळी केले. महाराष्ट्रात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली विकासाची मोठी कामे होत आहेत असे सांगून शौचालय, वीज, पाणी, मोफत धान्य, गॅस सिलिंडर यासह शेतकरी, महिला व युवकांकडे काटेकोरपणे लक्ष देण्याचे काम आपले सरकार करत आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले. महाराष्ट्रात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात गतिमान सरकार कार्यरत आहे, असा गौरव त्यांनी आपल्या भाषणातून केला.

यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर सडकून टीका के ली. महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका भारतीय जनता पक्ष व शिवसेनेने एकत्रित लढविल्या होत्या. त्या निवडणुकीत भाजपला सर्वाधिक जागा मिळाल्यानंतर दे वेंद्र फडणवीस यांना मु ख्यमंत्री करण्याचे निश्चित झाले होते; परंतु ठाकरे यांना ते रुचले नाही. एनडीएच्या प्रचंड विजयानंतर ठाकरे यांनी दिलेला शब्द पाळला नाही. सत्तेसाठी ते काँग्रेस व राष्ट्रवादीच्या मांडीवर जाऊन बसले. ठाकरे यांनी दिलेला शब्द मोडला. सत्तेसाठी शब्द फिरविणाऱ्या ठाकरे यांनी स्वतःची भू मिका स्पष्ट करावी. तिहेरी तलाक याबाबत ठाकरे यांनी आपले व पक्षाचे धोरण स्पष्ट करावे. राम मंदिराच्या बाबतीतही ठाकरे यांनी आपली भू मिका स्पष्ट करावी एवढेच नव्हे, तर मुस्लीम आरक्षणाच्या बाबतीत त्यांनी महाराष्ट्रातील जनतेला स्पष्टपणे सांगावे. कॉमन सिविल कोड अर्था त समान नागरी सं हिता याबाबतही ठाकरे यांनी महाराष्ट्रातील जनतेला स्वतःचे धोरण स्पष्ट करावे, असे खुले आव्हान अमित शहा यांनी यावेळी जाहीर सभेतून दिले. स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा इतिहास मिटवू पाहणाऱ्या कर्नाटकमधील ठाकरे यांच्या सहकारी पक्षाने घेतलेली भूमिका निषे धार्ह असल्याचे सांगून उद्धव ठाकरे यांनी एकाच वे ळी दोन नावांवर स्वार होऊ नये, असेही अमित शहा यावेळी म्हणाले. महाराष्ट्रातील जनतेसमोर उद्धव ठाकरे यांची 'पोल खुल गई' असे सांगत उद्धव ठाकरे यांनी औरंगाबाद, उस्मानाबाद व अहमदनगरचे नाव बदलण्याला विरोध के ला, असे ही अमित शहा यावेळी म्हणाले.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणाची सुरुवात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना आधुनिक लोहपुरुष म्हणून केली. आधुनिक चाणक्य म्हणून भाजपला लाभलेल्या अमित शहारूपी व्यक्तिमत्त्वाच्या मार्गदर्शनाखाली येणाऱ्या निवडणुकीत महाराष्ट्रातील ४५ च्या वर लोकसभेच्या जागा निवडून देण्याचे अभिवचन त्यांनी दिले. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या सभा आयोजनाबद्दल बोलताना ते पुढे म्हणाले की, नांदेडची भाजपाची जागा निवडून येणार नाही या भीतीने ही सभा आयोजित केल्या गेली काय या विरोधकांच्या वक्तव्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, नऊ वर्षांतील केंद्र सरकारने विकासाच्याबाबतीत केलेले कार्य लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी हे अभियान आहे.

# एनसीबीची डोंगरी परिसरात मोठी कारवाई! 20 किलो अंमली पदार्थ आणि कोट्यावधी जप्त; तिघांना अटक

गेल्या अनेक वर्षा पासून डी कंपनीसाठी हॉटस्पॉट ठरलेले डोंगरी पुन्हा एकदा चर्चेत आलेले आहे. यंदा एमडी या अंमली पदार्थ तस्करीसाठी डोंगरी चर्चेला आले आहे. नार्कोटिक कंट्रोल ब्युरो (NCB) मुंबईने डोंगरी परिसरातून अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या मोठ्या रॅकेटचा फर्दा फाशकेला आहे, यात एका महिलेसह तिघांना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून 20 किलो मेफेड्रोन (MD) जप्त केले आहे. अंदाजे 45 ते 50 कोटी रुपयांचे हे ड्रग्स आहे. एनसीबीच्या सूत्रांनी सांगितले की, सिंडिकेट टोळीच्या एका महिलेसह दोन प्रमुख सदस्यांना अटक करण्यासाठी मोठी शोध मोहीम राबवण्यात आली होती. एनसीबीने या कारवाईत 1.10 कोटी रुपयांची रोकडही जप्त केली असून छाप्यात 10 लाख रुपये किमतीचे 186.6 ग्रॅम सोन्याचे दागिनेही जप्त केले आहेत. जप्त करण्यात आलेली रोख रक्कम आणि सोन्याचे दागिने हे ड्रग्समधून मिळालेल्या आर्थिक उत्पन्नातून घेण्यात आले होते. एनसीबीला मुंबईच्या डोंगरी भागात असलेल्या एका रॅकेटबद्दल प्राथमिक माहिती मिळाली होती, ही टोळी मोठ्या प्रमाणात मेफेड्रोनच्या तस्करीमध्ये सक्रिय सहभागी असल्याची माहिती एनसीबीला समजली. ही टोळी एमएमआर प्रदेशाच्या विविध भागांमध्ये ड्रग्स विक्री करत होती. इंटेलिजन्स नेटवर्क तातडीने सक्रिय करण्यात आल्यामुळे त्वरित डोंगरी येथील एन. खान नावाच्या व्यक्तीची ओळख पटली.



एनसीबीला 9 जूनला मिळालेल्या विश्वसनीय माहितीनुसार एन. खान याच्याकडे डोंगरी येथील मुक्कामाच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात मेफेड्रोनचा साठा असल्याचे समजले. एनसीबी मुंबईने एन. खानच्या राहत्या ठिकाणी सापळा लावला आणि त्यावेळी त्याचा सहकारी ए.अली देखील परिसरात उपस्थित असल्याचे एनसीबीच्या लक्षात आले. त्याच्याकडे देखील ड्रग्स उपलब्ध असल्याची माहिती मिळताच, ए. अली याला अटक करण्यात आली आणि त्याच्याकडून 3 किलो मेफेड्रोन (MD) जप्त करण्यात आले.

एन. खानच्या घराची झडती घेऊन तात्काळ पाठपुरावा केल्याने त्याच्या घरातून आणखी 2 किलो एमडी जप्त करण्यात आले. एन. खानच्या राहत्या ठिकाणी चौकशी केली असता डोंगरी येथील ए. एफ. शेख नावाच्या महिलेची देखील ओळख पटली, जिने त्याला ड्रग्स पुरवले होते. त्यानंतर तात्काळ एनसीबी मुंबईची दुसरी टीम त्या भागात गेली आणि पुरवठादार महिला ए. एफ. शेखच्या घराची झडती घेतली. प्राथमिक घराच्या झडतीदरम्यान, 15 किलो मेफेड्रोन (M D) जप्त करण्यात आले, जे आवारात लपवून ठेवले होते.

पुढील विस्तारित शोधामुळे 1 कोटी 10 लाख 24 हजार रोख रक्कम आणि 186.6 ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने सापडले. एनसीबीच्या अधिकाऱ्यांनी जाब विचारल्यानंतर हे सर्व ड्रग्सची विक्री करून आलेल्या उत्पन्नातून जमा झाल्याचं तिने कबूल केलं. यासोतच तिच्याकडून आणखी काही आक्षेपार्ह कागदपत्रं जप्त करण्यात आली आहेत. तिन्ही आरोपींची चौकशी केली असता, ते गेल्या सात ते दहा वर्षांपासून या अवैध ड्रग्स तस्करी व्यवसायात गुंतल्याचे निदर्शनास आले. पुरवठादार महिलेचे नेटवर्क अनेक शहरांमध्ये होते आणि ती करोडो रुपयांच्या ड्रग्सचा मोठ्या प्रमाणात व्यवहार करत असल्याने तिने अंमली पदार्थांची तस्करी आणि त्याच्या आर्थिक व्यवहारांना तोंड देण्यासाठी एक कंपनी देखील स्थापन केली होती. या टोळीतील काही सदस्यांवर आधीच एनडीपीएस कायदा, 1985 च्या विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ड्रग्सच्या पैशातून निर्मा ण झालेल्या उर्व रित साथीदारांचा आणि इतर मालमत्तेचा शोध घेण्यासाठी सखोल तपास केला जात आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ). संपर्कः-9594418181 / 8424989898